




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक ११७ * नांदेड * सोमवार, दि. ४ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## आज पाच राज्यांच्या निवडणुकीचा निकाल

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** संपूर्ण देशाचे लक्ष सध्या पश्चिम बंगाल, आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पद्दुचेरी या ५ राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालाकडे लागले आहे. दि. ४ मे रोजी या सर्व राज्यांमधील निवडणुकांचे निकाल जाहीर होणार आहेत. तसेच राज्यातील बारामती आणि राहुरी विधानसभा पोट निवडणुकीचाही निकाल आजच जाहीर होणार आहे. बारामतीतून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि राहुरीतून अक्षय कर्डिले यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांची जादू आसाममध्ये पुन्हा चालणार, की गौरव गोगोई सत्ता मिळवणार याचा निकाल संध्याकाळपर्यंत समोर येणार आहे. भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएला तिसऱ्यांदा सत्ता मिळेल की काँग्रेस सत्ता मिळवण्यात यशस्वी होईल? हे आज स्पष्ट होईल. १२६ विधानसभा जागा असलेल्या आसाममध्ये बहुमतासाठी ६४ जागांची आवश्यकता आहे. हा जादुई आकडा कोण गाठते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

तामिळनाडूमध्ये द्रविड मुन्नेत्र कळघम (डीएमके) च्या नेतृत्वाखालील सेक्युलर प्रोग्रेसिव्ह अलायन्स (एसपीए) सत्ता कायम राखण्याच्या तयारीत दिसत आहे. चाणक्य, मॅट्रिक्स, पी-मार्क, प्रजा पोल, पीपल्स डायरी आणि पोल डायरी यांनी तामिळनाडूमध्ये डीएमकेला सत्ता मिळण्याची शक्यता वर्तवली आहे. तर पुदुचेरीमध्ये एनडीएला बहुमत मिळण्याची शक्यता आहे. भाजपला येथे १६ ते २० जागा मिळण्याची शक्यता आहे. केरळमधील डाव्या आघाडी एलडीएफचे १० वर्षांचे राज्य आता संपुष्टात येत असल्याचे दिसत आहे. सर्वेक्षणांनुसार काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफचे पुनरागमन होण्याची शक्यता आहे. या सर्वेक्षणात केरळमध्ये भाजपच्या लोकप्रियतेत लक्षणीय घट होण्याचाही अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर पश्चिम बंगालमध्ये भाजपा सत्ता स्थापन करण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा टीएमसीला हा मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे राज्यातील जनतेचे लक्ष हे राहुरी आणि बारामती पोटनिवडणुकीच्या निकालाकडे असणार आहे. अजित पवार आणि शिवाजी कर्डिले यांच्या निधनानंतर या दोन्ही ठिकाणी पोटनिवडणूक पार पडली. बारामतीत सुनेत्रा पवार आणि राहुरीत अक्षय कर्डिले यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

## मिसिंग लिंकवर सेल्फीसाठी थांबल्यास गुन्हा दाखल होणार!

**मुंबई (प्रतिनिधी) –** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील 'मिसिंग लिंक' सुरू झाल्यानंतर काही प्रवासी सेल्फी आणि फोटो काढण्यासाठी वाहनं थांबवत असल्याचं समोर आलं आहे. मात्र हा प्रकार आता प्रवाशांना महागात पडणार असून महामार्ग पोलिसांनी यावर कठोर कारवाई सुरू केली आहे. मिसिंग लिंकवर फोटो किंवा सेल्फीसाठी थांबल्यास प्रवाशांना आर्थिक दंड लागू शकतो, तसेच त्यांच्यावर गुन्हाही दाखल होऊ शकतो. त्यामुळे या कारवाईला सामोरं जायचं नसेल तर मिसिंग लिंकवरुन न थांबता सुखकर प्रवास करण्याचे आवाहन महामार्ग पोलिसांनी केलं आहे.

मिसिंग लिंकवर वाहनं १०० ते १२० किमी प्रतितास वेगाने धावत असतात. अशा परिस्थितीत मध्येच थांबून फोटो काढणं हे अत्यंत धोकादायक ठरत आहे. त्यामुळेच पोलिसांनी अशा प्रकारांवर बंदी घालत दंडात्मक कारवाईला सुरुवात केली आहे.

मिसिंग लिंक हा प्रकल्प विशेषतः घाटातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि अपघात टाळण्यासाठी उभारण्यात आला आहे. अशा ठिकाणी वाहन थांबवणं म्हणजे स्वतःचा आणि इतरांचा जीव धोक्यात घालणं ठरत आहे. महामार्ग पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, यापुढे मिसिंग लिंकवर थांबून सेल्फी किंवा फोटो काढणाऱ्यांवर थेट गुन्हा दाखल केला जाईल.

## शिडी तुटल्याने १६ तासांचा थरार! रील बनविणाऱ्या मुलांना एअरफोर्समुळे जीवदान

**उत्तर प्रदेश (वृत्तसंस्था) –** उत्तर प्रदेशातील सिद्धार्थनगर येथे घडलेली ही धक्कादायक आणि थरारक घटना सध्या सर्वत्र चर्चेत आहे. रविवारी सकाळी भारतीय हवाई दलाने राबवलेल्या विशेष बचाव मोहिमेत पाण्याच्या उंच टाकीवर अडकलेल्या दोन मुलांना सुरक्षितपणे खाली उतरवण्यात यश आले. जवळपास १६ तास या मुलांनी ना अन्न ना पाणी अशा परिस्थितीत टाकीवर जीव मुठीत धरून वेळ काढला होता. ही घटना कांशीराम रेसिडेन्शियल कॉलनी परिसरात घडली असून, संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली होती.

शनिवारी पाच मुले रील करण्याच्या उद्देशाने एका उंच पाण्याच्या टाकीवर चढली होती. मात्र, त्याच वेळी टाकीवर जाणारी शिडी तुटली आणि भीषण दुर्घटना घडली. सिद्धार्थ, शनी आणि गोलू ही तीन मुले खाली कोसळली, तर पवन आणि कल्लू ही दोन मुले टाकीच्या माथ्यावरच अडकून पडली. खाली पडल्यामुळे सिद्धार्थचा जागीच मृत्यू झाला, तर शनी आणि गोलू यांना गंभीर दुखापती झाल्या असून त्यांना तातडीने माधव प्रसाद त्रिपाठी मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

दरम्यान, टाकीवरील शिडी पूर्णपणे निकामी झाल्याने वर अडकलेल्या मुलांना खाली उतरण्याचा



कोणताही मार्ग उरला नव्हता. परिस्थिती गंभीर होत चालल्याने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) पथक गोरखपूरहून रात्री घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी बचावकार्य सुरू केले. मात्र, टाकीपर्यंत पोहोचण्यासाठी योग्य रस्ता नसल्यामुळे त्यांची उपकरणे आणि लिफ्ट वापरणे शक्य झाले नाही, त्यामुळे त्यांचे प्रयत्न अपयशी ठरले. ही परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने तातडीने राज्य सरकारकडे मदतीची मागणी केली. त्यानंतर भारतीय हवाई दलाला पाचारण करण्यात आले. गोरखपूर येथील सेंट्रल एअर कमांडमधून Mi-17V5 हेलिकॉप्टर तात्काळ रवाना करण्यात आले. रविवारी पहाटे सुमारे ५:२० वाजता हेलिकॉप्टर घटनास्थळी पोहोचले आणि बचाव मोहिमेला सुरुवात झाली.

## नाशिक 'टीसीएस' धर्मांतरण प्रकरणात धक्कादायक खुलासा

**नाशिक (प्रतिनिधी) –** नाशिक येथील नामांकित आयटी कंपनी 'टीसीएस'मधील महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण आणि बळजबरीने धर्मांतर करण्याच्या प्रकरणाने संपूर्ण देश हादरला आहे. या प्रकरणाच्या तपासात आता एक अत्यंत खळबळजनक माहिती समोर आली असून, पीडित तरुणींना 'शीरखुर्मा' सारख्या गोड पदार्थातून गुंगीचे औषध देऊन त्यांचे लैंगिक शोषण केल्याचा दाट संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, या प्रकरणातील मुख्य संशयित आणि अद्याप फरार असलेली आरोपी निदा खान हिचा अटकपूर्व जामीन न्यायालयाने फेटाळून लावला असून, अटकेतील चार आरोपींची रवानगी ५ मे पर्यंत पोलीस कोठडीत करण्यात आली आहे.

या प्रकरणात तपास करणाऱ्या विशेष पथकाला आता 'ड्रग्ज' आणि मादक पदार्थांचा नवा अँगल मिळाला आहे. प्राथमिक तपासानुसार, आरोपींनी आधी महिला कर्मचाऱ्यांशी मैत्री वाढवली आणि त्यानंतर त्यांना शीरखुर्मा खायला दिला. या पदार्थांमध्ये गुंगी आणणारे आणि कामोत्तेजक पदार्थ मिसळले गेल्याचा संशय आहे.

## तहानेनं व्याकूळ होऊन सहा वर्षीय मुलीचा मृत्यू? यवतमाळच्या पारधी बेड्यावरील खळबळजनक घटना

**यवतमाळ (प्रतिनिधी) –** राज्यभरात उन्हाचा पारा दिवसागणिक वाढताना दिसत आहे. परिणामी अनेक गावांमध्ये पाण्याची समस्या अधिक बिकट होत आहे. अशातच याच पाणी टंचाईचं भाषण वास्तव दाखवणारी बातमी आहे यवतमाळच्या अजंती पारधी बेड्यावरची. या बेड्या लगत नजर टाकल्यास दोन पाण्याच्या टाक्या १०० मीटरवर दिसून येतात. बेड्यावरील ५६ कुटूंबाच्या घरासमोर नळही दिसतो. मात्र १५ दिवस पाणी येत नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी वनवन भटकावे लागते. अशाच पाण्याच्या शोधात गेलेल्या ६ वर्षीय चिमुकलीची दुदैवी मृत्यू झाला आहे. हा मृत्यू उष्माघाताने झाल्याचा संशय व्यक्त केला जात



आहे. मात्र उष्मघाताचे कारण पुढे करण्यात आलं असलं तरी डॉक्टरांनी ही शक्यता फेटाळली आहे. त्यामुळे या मृत्यूचं गूढ कायम आहे.

नेर तालुक्यातील अजंती पारधी बेडा ३५० लोकसंख्या असलेले फासेपारधी समाजाचे गाव आहे. या गावातील प्रत्येक घरासमोर नळाचे कनेक्शन आहे. मात्र या नळाला पाणी येत नाही. गावकऱ्यांना पाण्यासाठी अर्धा किलोमीटर पायपीट करावी लागते. याच गावातील अनवी अनाडी भोसले ही चिमुकली दुपारच्या सुमारास आपल्या घरून डोक्यावर कळशी घेऊन पाण्यासाठी गेली होती. मात्र ती परत आलीच नाही. बऱ्याच वेळानंतर तिचा रस्त्यावर चक्कर येऊन मृत्यू झाल्याचे कळून आले. अनवी हिला कुठलाही आजार नव्हता, शिवाय तिला मळमळ किंवा उलटी झाली नाही. त्यामुळे तिचा नेमका मृत्यू कसा झाला? याचा शोध आरोग्य यंत्रणा घेत आहे. अनवी हिचे शवविच्छेदन न झाल्याने तिचा मृत्यू कसा? याचा शोध कसा लावावा असा प्रश्न सुद्धा आरोग्य यंत्रणेपुढे आहे.

## दुचाकी अपघातात माजी सभापती प्रकाश ढोणे यांचा मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)–** विमानतळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत आसना बायपास पुलावरून खाली उतरत असतांना दुचाकी स्लिप होऊन झालेल्या अपघातात वसमतचे आमदार राजू नवघरे यांच्या मामांचा मृत्यू झाला. सदर घटना रविवार दि. ३ एप्रिल रोजी दुपारी घडली.



वसमत पंचायत समितीचे माजी सभापती प्रकाश शेषराव ढोणे पाटील वय ६५ रा. ढोणी पांगरा ता. पूर्णा हे दुचाकीने नांदेडकडे येत होते. रविवारी दुपारी आसना पुलावरून खाली उतरतांना त्यांची दुचाकी स्लिप झाली. यात ढोणे गंभीर झाले होते. पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी जखमी ढोणे पाटील यांना रुग्णालयात पोहोचवण्यासाठी मदत केली, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान वसमतचे आमदार राजू नवघरे यांचे ढोणे पाटील हे मामा होत.

## पोलीस कर्मचाऱ्याचा संशयास्पद मृत्यू, परभणी-जिंतूर महामार्गावर सापडला मृतदेह

**परभणी (प्रतिनिधी) –** शहरात एक धक्कादायक घटना घडली आहे. एका पोलीस कर्मचाऱ्याचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. परभणी जिंतूर महामार्गावरील कोक पाटीवर मृतदेह सापडला आहे. गंगाधर राणा शिंदे असं मृत्यू झालेल्या ४० वर्षीय पोलीस कर्मचाऱ्याचं नाव आहे. दरम्यान, अचानक पोलीस कर्मचाऱ्याचा संशयास्पद मृत्यू झाल्यामुळं पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

परभणीच्या जिंतूर ते परभणी महामार्गावर दुचाकीवरुन प्रवास करत असताना पोलीस जमादाराचा संशयास्पद मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना



समोर आली आहे. परभणी पोलीस मुख्यालयातील बँड पथकात जमादार म्हणून कार्यरत असलेले ४० वर्षीय गंगाधर राणा शिंदे शनिवारी मध्यरात्रीनंतर ते जिंतूरहून परभणीकडे दुचाकीने निघाले होते. पहाटे अंदाजे अडीच ते तीन वाजण्याच्या सुमारास ते माक पाटी परिसरातून जात असताना ही घटना घडल्याचा अंदाज आहे. आज सकाळी एका शेतात त्यांचा मृतदेह आढळून आला. घटनास्थळी त्यांच्या दुचाकीचाही शोध लागला असून अज्ञात वाहनाने धडक दिल्याची प्राथमिक शक्यता वर्तवण्यात येत आहे. या प्रकरणी पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करुन तपास सुरू केला आहे. मृत्यू नेमका अपघाती आहे की अन्य काही कारणामुळे झाला. याबाबत अधिक तपास सुरु करण्यात आला आहे. दरम्यान, शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच नेमकी माहिती स्पष्ट होणार आहे. या घटनेमुळे पोलीस दलात तसेच स्थानिक परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## रोहित जैन आरबीआयचे नवे डेप्युटी गव्हर्नर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** कॅबिनेटच्या अपॉइंटमेंट कमिटीने रोहित जैन यांची भारतीय रिझर्व्ह बँकेचे नवीन डेप्युटी गव्हर्नर म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांची नियुक्ती ३ वर्षांसाठी असेल, जी ३ मे किंवा त्यानंतरपासून प्रभावी मानली जाईल. जैन सध्याचे डेप्युटी गव्हर्नर टी. रबी शंकर यांची जागा घेतील, ज्यांचा कार्यकाळ आज संपत आहे.

रोहित जैन यापूर्वी डिसेंबर २०२० पासून आरबीआयमध्ये कार्यकारी संचालक म्हणून सेवा देत होते. कार्यकारी संचालक म्हणून जैन यांनी पर्यवेक्षण विभाग (जोखीम, विश्लेषण आणि असुरक्षितता मूल्यांकन) ची जबाबदारी सांभाळली आहे. केंद्र सरकारने गेल्या महिन्यात डेप्युटी गव्हर्नर पदासाठी चार कार्यकारी संचालकांच्या मुलाखती घेतल्या होत्या.

## नसरापूर प्रकरणाचा तपास 'एसआयटी'कडे


**पुणे (प्रतिनिधी) –** नसरापूर येथे एका ६५ वर्षांच्या नराधमाने चार वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या केल्याची घटना घडली. या घटनेवरून लोकांमध्ये संताप वाढला असून नराधमाला फाशी द्या अशी मागणी केली जात आहे. आता या प्रकरणाचा तपास एसआयटी करणार आहे. नसरापूर घटनेचा तपास करण्यासाठी राज्य सरकारकडून स्पेशल इन्व्हेस्टिगेशन टीम तयार करण्यात आली आहे.

नसरापूरच्या घटनेनंतर लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात संताप निर्माण झाला आहे. नसरापूरमधील नागरिकांनी शनिवारी पुण्यातील नवले पूर बंद केला होता. त्यानंतर लोकभावना लक्षात घेऊन या प्रकरणाचा तपास लवकरात लवकर करण्यासाठी सरकारकडून हालचाल केली जात आहे. नसरापूर प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीमध्ये सहा अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यापैकी दोन अधिकारी या महिला आहेत. पुणे ग्रामीण पोलिसांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा या एसआयटीमध्ये समावेश आहे.

पुण्यातील नसरापूर येथे १ मे रोजी एक धक्कादायक घटना घडली. एका ६५ वर्षीय व्यक्तीने, घरासमोर खेळणाऱ्या चिमुकलीला गोठ्यात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. नंतर दगडाने ठेचून तिला निर्घृणपणे संपवलं आणि नंतर तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली झाकून ठेवला. दुपारी चिमुकली न दिसल्यानं तीची शोधाशोध केल्यानंतर चिमुकली गोठ्यात मृत अवस्थेत आढळली. त्यानंतर परिसरातले सीसीटीव्ही फुटेज चेक केल्यानंतर आरोपी चिमुकलीला गोठ्याच्या दिशेने घेऊन जाताना दिसला. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

नराधम आरोपीने वासरू दाखवतो म्हणून हात धरून त्या चिमुकलीला गोठ्यात नेलं आणि तिच्यावर अत्याचार केला. आजीकडे उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आलेल्या या मुलीच्या कुटुंबीयांनी आपल्याच मुली सोबत असं कधी घडेल असा विचारही केला नव्हता. मात्र दुपारी साडेतीन वाजताचे ते सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आणि अख्खं कुटुंब हादरलं. या घटनेनंतर गावकऱ्यांनी संताप व्यक्त करत पोलिसांना घेराव घातला.इतकं गंभीर कृत्य करूनही या नराधमाला त्याचा जराही पश्चाताप झालेला नाही. ग्रामस्थांनी त्याला चोप देऊन पोलिसांच्या ताब्यात दिलं. तरीही आपण काहीही चुकीचं केलेलं नाही, असा दावा या नराधमाने कोर्टात केला. शनिवारी पोलिसांनी त्याला कोर्टात हजर केलं. यावेळी युक्तिवादही नराधमाच्या समोरच झाला. मग न्यायाधीशांनी या नराधमाला प्रश्न विचारला, तुमची केस नेमकी काय आहे माहिती आहे का? त्यावर या नराधमाने अक्षरशः संताप येईल, असं उत्तर दिलं. ही मारामारीची किरकोळ केस आहे, असं हा असूर कोर्टात म्हणाला.

या प्रकरणातील नराधमाला कोर्टाने ५ दिवसांची कोठडी सुनावणी आहे. मात्र, या नराधमाने केलंलं हे पहिलं नाहीतर तिसरं कृत्य आहे. याआधी पुरावे नसल्यानं तो दोन वेळा निर्दोष सुटला. त्यामुळे किमान या प्रकरणात तरी त्याला कठोर शिक्षा व्हावी, अशी प्रतिक्रिया सर्वच स्तरातून उमटत आहेत. या प्रकरणातील चिमुकलीवर शनिवारी रात्री उशिरा अंत्यसंस्कार करण्यात आले. यानंतर तिच्या वडिलांनी मोठी भूमिका घेतली आहे. मुलीला न्याय मिळेपर्यंत नेते मंडळींनी आम्हाला भेटायला येऊ नये, असं तिच्या वडिलांनी म्हटलं आहे.



## अभिवक्ता संघाच्या निवडणुकीवरील स्थगिती उठली; ८ मे रोजीच मतदान

**नांदेड (प्रतिनिधी)–** अभिवक्ता संघ नांदेडच्या २०२६-२०२८ वर्षा साठीच्या निवडणुकीला बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाने दिलेली स्थगिती उठविली आहे. त्यामुळे ही निवडणूक आता नियोजित तारखेप्रमाणे शुक्रवार, दि. ८ मे रोजीच होणार या असल्याची माहिती या निवडणुकीचे मुख्य निवडणूक अधिकारी अॅड. अनिल पाटील यांनी दिली आहे.

अभिवक्ता संघ नांदेड ची निवडणूक २०२६ - २८ ची अधिसूचना अभिवक्ता संघाने दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर केलेली होती. परंतु सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक जिल्हा अभिवक्ता संघामध्ये महिलांना ३० टक्के प्रतिनिधित्व देण्यासंदर्भात आदेशित केले असल्याने निवडणूक लांबणीवर जाण्याची शक्यता होती. सदर आदेशाचे अनुपालन व्हावे म्हणून प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांनी अभिवक्ता संघ, नांदेड यांना दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी पत्र दिले.

त्या अनुषंगाने दिनांक दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी अभिवक्ता संघाने निवडणूक अधिसूचनेला स्थगिती देऊन दि. २१ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या सभेमध्ये अभिवक्ता संघ कार्यकारी मंडळामध्ये महिलांना ३० टक्के आरक्षण देऊ केले आणि त्यानुसार निवडणूक घेण्यासंदर्भात अॅड. अनिल व्ही. पाटील यांना मुख्य निवडणूक अधिकारी नेमले. अॅड. अनिल व्ही. पाटील यांनी निवडणूक घेऊन अध्यक्ष, उपाध्यक्ष, महिला उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, महिला सहसचिव, कोषाध्यक्ष आणि विशेष सहाय्यक असे पदाधिकारी आणि एकूण १२ कार्यकारिणी सदस्य ज्यामध्ये चार महिलांसाठी राखीव अशाप्रकारे एकूण वीस पदांसाठी निवडणूक घेण्यासंदर्भात आदेशित केलेले होते.

### मुख्य निवडणूक अधिकारी अॅड. अनिल पाटील यांची माहिती




त्या अनुषंगाने मुख्य निवडणूक अधिकारी अॅड. अनिल व्ही. पाटील यांनी दोन सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून अॅड. बी. जी. मोरे आणि अॅड. संदीप बी. ढगे यांना नियुक्त करून दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. या कार्यक्रमानुसार दि. २४ एप्रिल २०२६ रोजी अभिवक्ता संघाच्या मतदारांची प्राथमिक यादी जाहीर करण्यात आली. दिनांक २४ व २५ या दोन रोजी त्यावर आक्षेप मागविण्यात आले. त्यानंतर दिनांक २७ एप्रिल २०२६ **(पान ३ वर...)**

## अजितदादांच्या निधनानंतर महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन अध्यक्षपदावर मुरलीधर मोहोळ



**मुंबई (प्रतिनिधी) –** महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या रिक्त असलेल्या अध्यक्षपदावर अखेर केंद्रीय नागरी विमानवाहू राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. पुण्याच्या बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडलेल्या असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. अजित पवार यांच्या जाण्यानंतर हे पद काही काळ रिक्त होते.

गेल्या वर्षी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या निवडणुकांमध्ये मोठे राजकीय नाट्य पाहायला मिळाले होते. त्यावेळी अध्यक्षपदासाठी अजित पवार यांच्या विरोधात मुरलीधर मोहोळ यांनी शड्डू ठोकला होता. मात्र, ऐनवेळी दोन्ही नेत्यांमध्ये तडजोड झाली आणि अजित पवार यांची अध्यक्षपदी तर मुरलीधर मोहोळ यांची उपाध्यक्षपदी वर्णी लागली होती. आता अजित पवारांच्या निधनानंतर मोहोळ यांनी या संघटनेची धुरा आपल्या हाती घेतली आहे.

अजित पवार यांच्यानंतर त्यांच्या पत्नी आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे नाव अध्यक्षपदासाठी चर्चेत होते. दरम्यान, पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी संपर्क साधला असता त्यांनी स्पष्ट केले की, ऑलिंपिक असोसिएशनच्या अध्यक्षपदासाठी सुनेत्रा पवार यांची अद्याप नियुक्ती झालेली नाही.

# गोदावरी नदीपात्रातून अवैध रेती साठा प्रकरणी ५१ लाखांचा मुद्देमाल जप्त; सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत गोदावरी नदी पात्रातील अवैध रेती उपसा करून साठवून ठेवणाऱ्या रेती माफियांवर नांदेड ग्रामीण पोलिसांनी छापा कारवाई करुन एकूण ५१ लाख २४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, ही कारवाई ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड व पथकाने केली.

नांदेडचे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी ऑपरेशन क्रेक डाऊन अंतर्गत अवैधरित्या गोण खनिज (रेती) उपसा व वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करणे बाबत सर्व पो.स्टे.चे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे. त्या अनुषंगाने रविवार, दि. ३ मे रोजी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोउपनि ज्ञानेश्वर मटवाड, पोहेकॉ. अर्जुन मुंडे, पोकॉ. विष्णू कल्याणकर, पोकाँ. संतोष पवार, पोकाॅ. असीफ अली, पोकाँ. गवेंद्र सिरमलवार, सर्व नेमणूक पो.स्टे. नांदेड ग्रामीण अंमलदार यांचेसह पो. स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, कल्लाळ शिवारातील गोदावरी नदीपात्राचे किणाऱ्यावर काही इसम नदीतून अवैध रेती उपसा करून साठवून ठेवत आहेत. या गोपनीय माहितीवरून अधिकारी व अंमलदार असे दोन पंचांना सोबत घेऊन मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी १२ वाजताचे सुमारास छापा मारला असता पोलिसांना पाहुन या घटनेतील पाच आरोपींनी तेथून पळ काढला. सदर तराफे, इंजीन व ईतर साहित्य हे बाबाराव क्षीरसागर रा.कल्लाळ यांचे असल्याचे समजले.



नदीपात्रात असलेला मुद्देमाल नदीपात्रातून आणने शक्य नसल्याने तो जागीच नष्ट करण्यात आला. नदीकाठी उपसा करून साठवून ठेवलेली १० ब्रास रेती दोन पंचांसमक्ष जप्त करून पोलीस स्टेशन येथे जमा करण्यात आली. या घटनेतील सहा आरोपीतांविरूद्ध कलम ३०३(२) ३(५) था. न्या. से, सहकलम ४८ (७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम व पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम व १५ व सार्वजनीक संपत्ती नुकसान अधिनियम कलम ३,७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत गोदावरी नदी पात्रातील अवैध रेती उपसा करून साठवून ठेवणाऱ्या रेती माफियांवर नांदेड ग्रामीण पोलिसांनी छापा कारवाई करुन एकूण ५१,२४,३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी पोहेकॉ. अर्जुन केशव मुंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ग्रामीण पोलीस बाबाराव क्षीरसागर रा. कल्हाळ व अनोळखी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगिरीचे अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी कौतुक केले आहे.

# ‘यशवंत’मध्ये पर्यावरण संवर्धन, झिरो प्लास्टिक, ग्रीन कॅम्पस मिशनसाठी कृतिशील उपक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)** –यशवंत महाविद्यालयात भारत एनवोर्मेन्ट प्रोग्राम: भारत सस्टेनेबल कॅम्पस मिशन-२०२६ अंतर्गत विविध उपक्रम माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार व डॉ. एल. व्ही. पद्माराणी राव यांच्या समन्वयाद्वारे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. रिसर्च हाइट्स फाउंडेशनच्या सहकार्याने आयोजित या अभियानात १५८ विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला.

उपक्रमाचा प्रारंभ प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे व समन्वयिका डॉ. एल. व्ही. पदम ारानी राव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी उद्घाटनप्रसंगी हरित कॅम्पस हे केवळ शिक्षणाचे स्थान नसून ज्ञान आणि निसर्ग यांच्यातील सुसंवादाचे जिवंत उदाहरण असल्याचे प्रतिपादन केले.

तद्नंतर डॉ. कैलास इंगोले यांच्या सम न्वयाखाली यशवंत महाविद्यालय ते भाग्यनगर म ार्गावर समुदाय जनजागरण रॅली काढण्यात आली. भाग्यनगर परिसरात विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश उपस्थितांना दिला.

डॉ. राजरत्न सोनटक्के यांच्या प्रयत्नातून झिरो प्लॅस्टिक ड्राईव्ह अंतर्गत बाबानगर येथील शासकीय रुग्णालयात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. डॉ. रमेश चिल्लावार यांच्या समन्वयाखाली कॅम्पस ग्रीन ॲक्शन अंतर्गत महाविद्यालयाच्या बोटॅनिकल गार्डनमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. त्या ठिकाणी डॉ. संतोष राऊत यांनी कचरा व्यवस्थापन व जलपुनर्वापर यावर मार्गदर्शन केले. डॉ. बी. बालाजीराव यांनी विद्यार्थ्यांना पोस्टर सादरीकरणाकरिता सहकार्य केले. डॉ. एम. एम. व्ही. बेग यांनी महाविद्यालयाचे ग्रीन ऑडिट केले. डॉ. मदन अंबोरे यांनी सस्टेनेबलिटी आयडियाज अँड सोल्युशन या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण कल्पना मांडण्याकरिता सहकार्य केले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्रियंका सिसोदिया, लेफ्टनंट प्रा. श्रीकांत सोमठाणकर, प्रा. अभिनंदन इंगोले, डॉ. कांचन गायकवाड यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी डॉ. प्रवीणकुमार मिरकुटे, डॉ. योगेश नकाते, डॉ. सचिन पाटील, डॉ.विश्वाधार देशमुख, डॉ. वीरभद्र स्वामी, डॉ. अजय गव्हाणे आदींची उपस्थिती होती.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक गजानन पाटील, जगन्नाथ महामुने यांनी सहकार्य केले. या मिशनच्या यशस्वीतेमागे महाविद्यालय प्रशासनाचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, प्राध्यापकांचा सक्रिय सहभाग आणि विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण प्रतिसाद महत्त्वपूर्ण ठरला. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून पर्यावरणपूरक व सामाजिकदृष्ट्या जबाबदार कॅम्पस घडविण्याच्या महाविद्यालयाच्या ध्येयाला अधिक बळकटी मि ळाली.

# नसरापूर घटनेतील चिमुरडीला मसापची श्रद्धांजली

## आरोपीला कठोर शिक्षा करण्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)** –मानवी मनाच्या संवेदनांचा खून करणाऱ्या आणि हृद्य पिळवटून टाकणाऱ्या नसरापूर येथील चिमुकलीवरील अत्याचाराच्या घटनेचा निषेध करीत पीडित चिमुरडीला मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेडच्या वतीने रविवारी महात्मा फुले पुतळ्यासमोर मेणबत्ती प्रज्वलित करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या घटनेतील नराधम आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणीही मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

यावेळी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य तथा मराठवाडा साहित्य परिषदेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य देविदास फुलारी, मसाप शाखा नांदेडचे उपाध्यक्ष श्रीनिवास मस्के, कार्यवाह प्रा. महेश मोरे, सहकार्य राम तरटे, कोषाध्यक्ष व्यंकटेश चौधरी, डॉ. पी. विठ्ठल, अरुण अतनुरे, मारुती मुंडे, भैय्यासाहेब गोडबोले, अशोक कुबडे, धोंडीबा मोरे, शिवाजी जोगदंड दगडगावकर, यशवंत थोरात आदींची उपस्थिती होती.

# बारावी परीक्षेत किनवटच्या ‘एसव्हीएम’ शाळेचा ७३ टक्के निकाल



**किनवट (प्रतिनिधी)**– येथील सरस्वती विद्या मंदिर उच्च माध्यमिक विद्यालयाने आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखत इयत्ता बारावी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

विद्यालयाचा एकूण निकाल ७३.४४ टक्के लागला आहे. यामध्ये विज्ञान विभागाने बाजी मारत ९६.५५ टक्के निकालाची नोंद केली आहे. कला शाखेचा निकाल ५१.११ टक्के तर व्यावसायिक अभ्यासक्रमाचा निकाल ४५ टक्के लागला आहे. विज्ञान शाखेतून श्रेयस रमेश श्रीरामवार याने ७८.६७ टक्के गुण मिळवून प्रथम येण्याचा मान पटकावला. कु. अपेक्षा गोविंद चक्करवार हिने ७५.६७ टक्के गुण मिळवून द्वितीय तर कु प्राची अनिल आडे हिने ७४.५० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.

कला शाखेतून कु. सलोनी गणेश गुंजकर हिने ८३.५० टक्के गुण मिळवून प्रथम, कु. श्रुतिक हनमंत गुंजकर हिने ७९.१७ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर कु. जयश्री जनार्धन माघाडे हिने ७८.३३ टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे. व्यावसायिक अभ्यासकमाचा एकूण निकाल ४५ टक्के लागला आहे. यातीलही विशेष प्राविण्यासह सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव नेम्मानीवार, सचिव तथा मुख्याध्यापक कृष्णकुमार नेम्मानीवार उपमुख्याध्यापक संजय चव्हाण, पर्यवेक्षक रेणुकादास पहूरकर तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले आहे.

# बारावीच्या निकालात एकलव्य कॉलेजची १००% निकालाची अखंडित परंपरा



**नांदेड (प्रतिनिधी)** – स्थापनेपासून अर्धापूर तालुक्यातीले इंग्लिश शाळा एकलव्य इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, शेलगाव रोड बामणी येथील विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी-म ार्च २०२६ मध्ये झालेल्या बारावीच्या परीक्षेत पुन्हा एकदा गगनभरारी घेतली आहे. शाळेचा विज्ञान शाखेचा निकाल १००% लागला आहे. या यशामुळे निकालाची परंपरा कायम राखली आहे.

विद्यार्थी आणि शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीचे फळ या निकालात दिसून येत असल्याचे प्रतिपादन संस्थेच्या अध्यक्षा सौ. सविता मारोतराव कंठेवाड यांनी केले. शाळेच्या सचिव डॉ. श्रद्धा कंठेवाड यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीचे फळ मिळाले आहे, असे मत व्यक्त केले आहे. निखिल खिल्लारे ७३% गुण घेऊन कॉलेजमधून सर्वप्रथम आला आहे. युसूफ शेख ६६:८३%, समी मिराज ६५:६७% गुण मिळविले आहेत.

# पुंडलिकराव घुगे यांचे निधन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –सिडको परिसरातील गुरूवार बाजार शंकरनगर येथील रहिवासी पुंडलिकराव बालाजी घुगे यांचे पुणे येथील खासगी रुग्णालयात उपचार चालू असताना १ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातू, पणतू असा परिवार आहे. २ मे रोजी सिडको स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# बारावी परीक्षेत महात्मा ज्योतीबा फुले विद्यालयाच्या यशाची परंपरा कायम

**किनवट (प्रतिनिधी)** –फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी परीक्षेत मिलिंद शिक्षण प्रसारक मंडळ अंबाडी, संचालित महात्मा ज्योतीबा फुले कनिष्ठ महाविद्यालय गोकुंदा किनवटने याही वर्षी आपल्या निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत शैक्षणिक आलेख उंचावत ठेवला आहे.

महाविद्यालयाच्या २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात विज्ञान शाखेत एकूण ४५४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ४३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विज्ञान शाखेचा निकाल ९६ टक्के असून, यामध्ये प्रथम श्रेणी (६० टक्क्यांपेक्षा जास्त) ७६ विद्यार्थी, विशेष प्रावीण्य (७५ टक्क्यांपेक्षा जास्त) ११ विद्यार्थी, (८० टक्क्यांपेक्षा जास्त) ०३ विद्यार्थ्यांनी अतिविशेष प्रावीण्य प्राप्त केले आहे.

विज्ञान शाखेतून सर्वाधिक गुण घेऊन कु. अनुष्का संजय कावळे-८४.६७ टक्के ही प्रथम, विघ्नेश बालाजी पोपुलवाड ८१.५० टक्के हा द्वितीय तर कु. प्राप्ती फुलाजी भोंगाळे हिने ८०.५० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे. विज्ञान शाखेतून हॉर्टिकल्चर या विषयात २०० पैकी २०० गुणांसह कु. अनुष्का संजय कावळे, आणि कु. समीक्षा प्रशांत डवरे हिने घवघवीत यश संपादन केले आहे. कला शाखेत एकूण २४२ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. या शाखेचा निकाल ६२ टक्के लागला आहे. यामध्ये प्रथम श्रेणी (६० टक्क्यांपेक्षा जास्त) २१, विशेष प्राविण्यात (७५ टक्क्यांपेक्षा जास्त) ०५, अतिविशेष प्राविण्यात (८० टक्क्यांपेक्षा जास्त) ०३ विद्यार्थी गुणानुक्रमे उत्तीर्ण झाले.

कला शाखेत सर्वाधिक गुण घेवून कु. नंदिनी संतोष बोईनवाड ही ८९.६७ टक्के गुण घेवून पहिली आली. कु. नंदिनी संतोष कोरेवाड ही ८६ टक्के घेवून ही द्वितीय, तर प्रदीप इंदल जाधव याने ८१. टक्के गुण घेवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. कला शाखेतून किनवट तालुक्यातून प्रथम येण्याचा बहुमान कु. नंदिनी संतोष बोईनवाड या विद्यार्थिनीने तर विज्ञान शाखेतून कु. अनुष्का संजय कावळे हिने मिळविला आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव अभि. प्रशांत ठमके, कोषाध्यक्षा शुभांगी ठमके, मुख्याध्यापक तथा प्राचार्य प्रमोद मुनेश्वर, उपप्राचार्य श्याम जाधव, उपमुख्याध्यापक किशोर डांगे, पर्यवेक्षक प्रा. संतोष बैस ठाकूर, प्रा. रघुनाथ इंगळे, मनोज भोयर, मुकुंद मुनेश्वर आणि महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.

# ‘एमजीएम’मध्ये महाराष्ट्र दिन साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)** –एमजीएम कॅम्पस-मध्ये महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला.

या दिनाचे औचित्य साधून यावेळी म हात्मा गांधी आणि महाराष्ट्र राज्याचे प्रथम मुख्यमंत्री, आधुनिक महाराष्ट्राचे निर्माते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. वंदेम ातरम या गीताने कार्यक्रमास सुरूवात झाली. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगीरे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी ग्रंथालयशास्त्र महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. गोविंद हंबर्डे, डॉ. गणेश जोशी, महेश महामुने, डॉ. अर्चना राजूरकर, एस. ए. हाश्मी, डॉ. अर्शद हाश्मी, डॉ. कल्पना जोंधळे-पैठणे, डॉ. जसबीरसिंग सिद्धू, प्रा. नारायण कदम, डॉ. सुभाष मुत्तेमवार, क्रीडाशिक्षक मनोजकुमार राठोड तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या बँडपथकाचे प्रमुख सूर्यवंशी आणि विद्यार्थ्यांनी यावेळी विविध शौर्य गीते वाजवली. कार्यक्रमास नारायण बोंढारे, सूर्यवंशी आणि भिसे यांचे सहकार्य लाभले.

# सौ. श्रेया जोशी यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – फरांदेनगर येथील रहिवासी तथा संगणक अभियंता सौ. श्रेया प्रवीण जोशी (२५) यांचे दि. २९ एप्रिल रोजी पुणे येथील एका खासगी रुग्णालयात निधन झाले. त्या सेवानिवृत्त मुख्याध्यापक कमलाकरराव जोशी यांच्या स्नुषा व संगणक अभियंता प्रवीण जोशी यांच्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात पती, आई, वडील, सासू, सासरे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर दि. ३० एप्रिल रोजी सायंकाळी गोवर्धनघाट येथील शांतीधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शशिकलाबाई जाधव यांचे निधन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – शशिकलाबाई भगवानराव जाधव यांचे ३० एप्रिल रोजी रात्री निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी तळणी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, चार सुना व नातवंडे असा परिवार आहे.

**पान १ वरून...**

**अभिवक्ता संघाच्या निवडणुकीवरील...**

रोजी अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात आली. आणि त्याच दिवशी दुपारी १२ नंतर नामनिर्देशन पत्र विक्री व स्वीकृती तसेच दिनांक २८ एप्रिल आणि २९ एप्रिल २०२६ रोजी ११ ते ३ या वेळेत नामनिर्देशन पत्र विक्री व स्वीकृतीसाठी ठेवण्यात आली होती. दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजता उमेदवारांची प्राथमि क यादी प्रसिद्ध करण्यात आली होती आणि नामनिर्देशन पत्र छाननी ही दि. ३० एप्रिल २०२६ रोजी ११ ते ३ वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी छाननीनंतर उमेदवारांची यादी सायंकाळी पाच वाजता प्रसिद्ध करण्यात आली. त्यानंतर दि. २ मे २०२६ ही तारीख नामनिर्देशन पत्र परत घेण्याची तारीख आणि उमेदवारांची अंतिम यादी ही दिनांक २ मे २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजता जाहीर करण्यात येणार होती.

परंतु, अभिवक्ता संघातील काही वकिलांनी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांच्याकडे अर्ज करून अभिवक्ता संघाच्या निवडणुकीत सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशाचे अनुपालन होत नसून महिलांना ३० टक्के आरक्षण देण्यात आलेले नाही. मतदार यादीत अनेक त्रुटी असल्याचा आक्षेप घेत निवडणुकीला स्थगिती देण्यासंदर्भात विनंती केली होती. त्या अनुषंगाने बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांनी दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी ठराव क्रमांक ३३/२०२६ अन्वये तीन सदस्यांची फॅक्ट फाइंडिंग समिती गठीत केली. ज्यामध्ये बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र गोवाचे माजी अध्यक्ष व्ही. डी. साळुंखे, नांदेड अभियंता संघाचे सदस्य ॲड. जी. के. पोफळे आणि ॲड. एस. एम. पुंड यांची नियुक्ती करून सदर समितीचा अहवाल सादर होईपर्यंत अभियोग्यता संघाची निवडणूक स्थगित करण्यासंदर्भात आदेशित केलेले होते.

यात दि. २ मे २०२६ रोजी समितीने सकाळी दहा वाजता अभिवक्ता संघाच्या निवडणूक कार्यालयात मिटिंग कॉल करून अभिवक्ता संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव यांच्यासह मुख्य निवडणूक अधिकारी व दोन सहायक निवडणूक अधिकारी आणि तक्रारदार ॲड. कार्तिक बोकारे यांना बोलाविले. परंतु अभिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. आशिष गोदमगावकर हे सदर मिटींगला अनुपस्थित राहिले. त्यांच्या अनुपस्थितीमध्ये अभिवक्ता संघाची बाजू उपाध्यक्ष ॲड. संजय वाकोडे आणि सचिव ॲड. अमोल वाघ यांनी मांडली. तसेच निवडणूक अधिकारी म्हणून मुख्य निवडणूक अधिकारी ॲड. अनिल व्ही. पाटील आणि सहायक निवडणूक अधिकारी ॲड. मोरे आणि ॲड. ढगे यांनी त्यांची बाजू मांडली, सर्वांचे म्हणणे ऐकून घेऊन दुपारी अडीच ते तीन वाजताचे सुमारास त्यांचा अहवाल बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र, गोवा यांच्याकडे पाठविण्यात आला. सदर अहवालाच्या अनुषंगाने बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र गोवा यांनी तातडीची बैठक बोलावून अभिवक्ता संघाच्या निवडणुकीसंदर्भातले प्रकरण हे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याचा व त्या प्रकरणांमध्ये निवडणुकीसंबंधाचा अहवाल प्रमुख जिल्हा न्यायालय न्यायाधीशांकडून सादर झालेला असल्यामुळे नांदेड अभियंता संघाच्या निवडणुकीत दिलेली स्थगिती उठविली असल्याचा आदेश पारित केला.

# मैत्री पाडमुख हिचे सुयश

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील विश्वनाथअप्पा हुरणे ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थिनी मैत्री रितेश पाडमुख हिने १२ वी परीक्षेत ९३% गुण प्राप्त करून घवघवीत यश प्राप्त केले आहे.

मैत्री पाडमुख ही विश्वनाथअप्पा हुरणे ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी आहे. बारावी परीक्षेत तिने इंग्रजीत ८६, इकॉनॉमिक्समध्ये ९५, बुककिपिंग अँड अकाउंटन्सी ९१, सीक्रेटरियल प्रॅक्टिसमध्ये ९८, मॅथ्स अँड स्टॅटिस्टिक्स (कॉमर्स) ९६, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (कॉमर्स) मध्ये ९२ असे एकूण ६०० पैकी ५५८ गुण प्राप्त केले आहेत. अशाप्रकारे तिने ९३% गुण प्राप्त केले आहेत. या यशाबद्दल तिचे गुरुजन, पालक ॲड. रितेश पाडमुख, ॲड. शालन रितेश पाडमुख, चिंतामण आनंदराव पाडमुख, शशिकला चिंतामण पाडमुख, राजेश पाडमुख यांच्यासह मित्र परिवारातर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

# स्वारातीम विद्यापीठातील तीन कर्मचाऱ्यांचा सेवागौरव सोहळा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील तीन कर्मचाऱ्यांचा सेवागौरव सोहळा गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६ रोजी अधिसभा सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. प्रदीर्घ व समर्पित सेवेनंतर सेवानिवृत्त होत असलेल्या या कर्मचाऱ्यांचा विद्यापीठाच्या वतीने सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात आला.

सोहळ्यात उपकुलसचिव मेघशाम वामनराव साळुंके, कनिष्ठ लिपीक कविता गोविंदराव गुरधाळकर आणि प्रयोगशाळा परिचर राजकुमार वसंतराव हस्सेकर यांचा कुटुंबियांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. उपकुलसचिव मेघशाम साळुंके यांनी २७ वर्षे ९ महिने सेवा बजावत सहायक अधीक्षक पदापासून उपकुलसचिव पदापर्यंतचा प्रवास पूर्ण केला. परीक्षा, शैक्षणिक विभाग व लातूर उपकेंद्रातील त्यांच्या कामगिरीचा गौरव करण्यात आला. कविता गुरधाळकर यांनी २६ वर्षे ८ महिने आस्थापना, ज्ञानस्रोत केंद्र, परीक्षा व लेखा विभागात शिस्तबद्ध सेवा दिली. तर राजकुमार हस्सेकर यांनी ३४ वर्षे ७ महिने जीवशास्त्र संकुलात कार्यरत राहून मोलाचे योगदान दिले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन हे होते. यावेळी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य तथा जैवतंत्रशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. बी. एस. सुरवसे, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सत्कारमूर्ती मेघशाम साळुंके, कविता गुरधाळकर, गोविंदराव गुरधाळकर आणि राजकुमार हस्सेकर, सौ. हस्सेकर यांना शाल, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी कर्मचाऱ्यांच्या निष्ठा व योगदानाचे कौतुक करत विद्यापीठ हे एक कुटुंब असून, कर्मचाऱ्यांचा गौरव करणे ही परंपरा असल्याचे सांगितले. सत्कारमूर्तींनीही आपल्या भावना व्यक्त करत सहकाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, उद्धव हंबर्डे, शिवराम लुटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी तर व आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारोती गायकवाड यांनी केले. कार्यक्रमास विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, डॉ. सिंकू कुमार सिंग, डॉ. टी. ए. कदम, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, सहा. कुलसचिव रामदास पेद्देवाड, तुकाराम भुरके, अनिरुद्ध राहेगावकर, विधी अधिकारी विनायक भोसले यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व मान्यवर व सत्कारमूर्तींचे कुटुंबीय उपस्थित होते.

# प्रगतीमंत्र



## विद्यार्थी-पालकांना तणावमुक्तीच्या टिप्स

**बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. बारावीनंतर कोणत्या स्ट्रीमला प्राधान्य द्यावे ? करिअर कशात करायला हवे ? असे अनेक प्रश्न आपल्याला सतावत असतात. बऱ्याचदा विद्यार्थ्यांना स्ट्रीम निवडताना खूप अडचणींना तोंड द्यावे लागते. बऱ्याचदा विद्यार्थी कोणत्या क्षेत्रात करिअर करणार हे येथेच ठरविले जाते. विद्यार्थ्यांसोबतच त्यांच्या पालकांनाही आपल्या पाल्याने कोणत्या क्षेत्रात पुढे जावे, याची चिंता सतावत आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थी आणि पालक दोघांनाही तणावातून मुक्त होण्यासाठी काही सोप्या टिप्स आपण जाणून घेणार आहोत. ज्यांच्या मदतीने तुम्हाला पुढील करिअर निवडण्यात कोणतीही अडचण येणार नाही...**

- तुमचे प्राधान्य जाणून घ्या : अकरावी, बारावीपर्यंत तुम्ही कोणत्या स्ट्रीममध्ये शिक्षण घेतले ? त्यात तुम्हाला खरंच रस आहे का ? हा प्रश्न स्वतःला विचारा. पुढील स्ट्रीम निवडताना, तुम्हाला कोणत्या विषयात रस आहे हे जाणून घेतले पाहिजे. तुम्ही एखाद्या विषयाचा अभ्यास करण्यास उत्सुक आहात की नाही ? हे जाणून घेणे खूप महत्त्वाचे आहे. तुम्हाला जे विषय आवडतात तेच तुम्ही अभ्यासायचे निवडले पाहिजेत. यासह, त्या विषयाबद्दल जाणून घेण्यासाठी अधिक उत्सुक राहणे गरजेचे आहे.
- तुमची ताकद समजून घ्या : तुमचा आवडता विषय तपासण्यासोबतच तुम्हाला कोणत्या विषयात पकड आहे हे देखील समजून घ्यावे लागेल. तुम्ही कोणत्या विषयात चांगले गुण मिळवता ? बहुतांश वेळा विद्यार्थ्यांना सोशल सायन्समध्ये जास्त गुण असले तरी त्यांचा कल मात्र सायन्सकडे असतो. ते आर्ट्समध्ये जास्त चांगले गुण मिळवू शकतात. पण त्यांना हे लक्षात येत नाही.
- पालकांचे ऐका : काहीवेळा पालकही विद्यार्थ्यांना स्ट्रीमबाबत समजावून सांगतात. मुलांनी कोणत्या क्षेत्रात प्रगती करावी हे ते सांगतात. अशा परिस्थितीत तुमचे मत पालकांच्या मताशी न जुळण्याची शक्यता आहे. तुमची पसंती आणि धारणा कोणत्या क्षेत्रात आहे हे पालकांना समजावून सांगा आणि त्यानंतरच निर्णय घ्या.
- बजेट लक्षात ठेवा : कधी कधी तुमची स्वप्ने मोठी असतात. पण आई-वडिलांना आर्थित परिस्थितीमुळे हे शिक्षण देणे शक्य नसते. अशावेळी अभ्यासक्रम निवडताना आणि पुढे जाताना विद्यार्थ्यांनी पालकांची परिस्थिती लक्षात घेऊनच क्षेत्र निवडावे.

## बारावी सायन्स नंतर... कशात करावे करिअर?

**बारावी हा विद्यार्थ्यांच्या जीवनातला एक खूप महत्त्वाचा टप्पा आहे. बारावीनंतर घेतलेले अभ्यासक्रम भविष्यात विद्यार्थ्यांच्या कारकिर्दीचा पाया रचतात. म्हणूनच, विद्यार्थ्यांना करिअरच्या महत्त्वपूर्ण पर्यायांची माहिती असणे आवश्यक आहे. बारावीनंतर विज्ञान आणि वाणिज्य शाखेतले करिअरचे अनेक पर्याय आहेत.**

सायन्स शाखेतील विद्यार्थ्यांकडे अन्य विद्यार्थ्यांपेक्षा अधिक पर्याय आहेत. विज्ञान शाखेतील विद्यार्थी आर्ट अँड ह्युमॅनिटीज किंवा कॉमर्सचा कोर्स घेऊ शकतात. परंतु वाणिज्य व कला शाखेचे विद्यार्थी विज्ञान संबंधित अभ्यासक्रम घेऊ शकत नाहीत. तसे, बहुतेक लोकांना केवळ १२ वी सायन्सनंतरच्या अभियांत्रिकी आणि वैद्यकीय अभ्यासक्रमांबद्दल माहिती असते. पण बारावी सायन्सनंतर अभियांत्रिकी व वैद्यकीय अभ्यासक्रमांशिवाय बरेच पर्याय उपलब्ध आहेत.

### 12 वीनंतर विज्ञान (पीसीएम) कोर्स पर्याय

- अभियांत्रिकी ( बीटेक / बीई ) : एरोनॉटिकल अभियांत्रिकी, ऑटोमोबाईल अभियांत्रिकी, सिव्हील अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स व कम्युनिकेशन अभियांत्रिकी, औद्योगिक अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, इंस्ट्रूमेंटेशन अँड कंट्रोल अभियांत्रिकी, केमिकल अभियांत्रिकी, खाण अभियांत्रिकी, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी, सागरी अभियंता आयएनजी, प्रिंट आणि माध्यम तंत्रज्ञान, परमाणू अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, डेअरी तंत्रज्ञान, मेकॅनिकल इंजिनिअरिंग.
- बीएससी : भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, जीवशास्त्र, खगोलशास्त्र, फॉरेन्सिक विज्ञान, भूविज्ञान, कृषी, माहिती तंत्रज्ञान, सांख्यिकी, औद्योगिक रसायनशास्त्र, फॅशन तंत्रज्ञान, होमसायन्स, न्यूट्रिशन, क्लोदिंग अँट टेक्सटाइल, एक्स्टेंशन आणि कम्युनिकेशन, समुद्री विज्ञान, मानव विकास आणि कौटुंबिक अभ्यास, फॅशन डिझाइन, पर्यावरण विज्ञान इत्यादी विषयांतील बीएससी.

✓ आर्किटेक्चर
✓ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन
✓ मर्चंट नेव्ही
✓ नॉटिकल टेक्नॉलॉजीमधील बीएससी
✓ नेव्हल आर्किटेक्चर अँड शिपबिल्डिंगमधील बी. टेक.
✓ व्यावसायिक पायलट
✓ एव्हिएशन विज्ञानमधील बीएससी
✓ संरक्षण



### बारावी विज्ञान (पीसीबी) नंतरचे अभ्यासक्रम

एमबीबीएस, BDS-दंतचिकित्सा, बीएएमएस-आयुर्वेद, बी.एच.एम.एस.-होमिओपॅथी, बीयूएमएस - यूनानी, बीएनवायएस - निसर्गोपचार आणि योगिक विज्ञान, बीएसएमएस-सिद्ध चिकित्सा व विज्ञान, पशुवैद्यकीय सेवा व पशुसंवर्धन, फिजिओथेरपिस्ट, बीएससी व्यावसायिक थेरपिस्ट, बीएससी न्यूट्रिशन अँड डायटिटिक्स, इंटिग्रेटेड एमएससी, बीएससी- बायोटेक्नॉलॉजी, बीएससी (दुग्ध तंत्रज्ञान/ नर्सिंग/ रेडिओलॉजी/ प्रोस्थेटिक्स आणि ऑर्थोटिक्स, ऑप्टोमेट्री), बीएससी स्पीच अँड लँग्वेज पॅथॉलॉजी, बीएससी अँथ्रोपॉलॉजी, बीएससी रेडियोग्राफी, बीएससी पुनर्वसन थेरपी, बीएससी फूड टेक्नोलॉजी, बीएससी हॉर्टिकल्चर, बीएससी होम सायन्स/न्यायवैद्यक, बॅचलर ऑफ फार्मसी, बीएमएलटी (मेडिकल लॅब टेक्नॉलॉजी), बीओटी ( ऑक्युपेशनल थेरपी ).

- बिझनेस आणि कॉमर्स अभ्यासक्रम : बी.कॉम, हॉटेल मॅनेजमेंटमध्ये, रिटेल मॅनेजमेंटमध्ये बीए, रिटेल मॅनेजमेंटमध्ये बीए, हॉटेल मॅनेजमेंटमध्ये बीएससी, फॅशन मर्चेंडायझिंग अँड मार्केटींगमधील बीए, ट्रॅव्हल अँड टुरिझम मॅनेजमेंट मध्ये बीए, बॅचलर ऑफ बिझनेस इकॉनॉमिक्स, बॅचलर ऑफ इंटरनॅशनल बिझनेस ॲण्ड फायनान्स, मॅनेजमेंट स्टडीज, बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बँकिंग आणि इन्शुरन्स, चार्टर्ड अकाउंटन्सी, कंपनी सेक्रेटरी.
- डिप्लोमा कोर्स : न्यूट्रिशन अँड डायटिटिक्समधील डिप्लोमा, डिप्लोमा नर्सिंग, टेक्सटाइल डिझाइनिंगमध्ये डिप्लोमा, डिप्लोमा इन कॉम्प्युटर इंजिनीअरिंग, डिप्लोमा इन वेब डिझाईन, डिप्लोमा इन फॅशन डिझायनिंग, सिव्हिल इंजिनीअरिंग मध्ये डिप्लोमा, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीमध्ये डिप्लोमा, ड्रॉईंग अँड पेंटिंग, डिप्लोमा इन ड्रेस डिझायनिंग, डिप्लोमा कॉम्प्युटर हार्डवेअर, डिप्लोमा इन ॲनिमेशन अँड मल्टीमीडिया, डिप्लोमा (एअर होस्टेस, क्रू), डिप्लोमा इन इव्हेंट मॅनेजमेंट, केमिकल इंजिनिअरिंगमधील डिप्लोमा, सॉफ्टवेअर अँड नेटवर्किंगमधील डिप्लोमा, फॉरेन लँग्वेज मध्ये डिप्लोमा.

## Polytechnic शिक्षणातून मिळेल चांगल्या पगाराची नोकरी

**सरकारी नोकऱ्या आणि करिअरसाठी पॉलिटेक्निक डिप्लोमा कोर्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. वास्तविक, पॉलिटेक्निक अभ्यासाच्या क्षेत्रात रोजगाराच्या दृष्टिकोनातून प्रचंड क्षमता आहे. हा तांत्रिक अभ्यासक्रम घेऊन विद्यार्थी विविध क्षेत्रात सरकारी नोकऱ्या करू शकतात, मोठ्या खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये नोकरी मिळवू शकतात किंवा स्वयंरोजगार सुरू करू शकतात.**

पॉलिटेक्निक अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून कौशल्य विकासाबरोबरच प्रात्यक्षिक प्रशिक्षणही दिले जाते. तुमच्या आवडीनुसार पॉलिटेक्निक कोर्सला प्रवेश घेऊन तुम्ही या क्षेत्रात करिअर करू शकता. विद्यार्थी सरकारी आणि खासगी संस्थांमधून पॉलिटेक्निक अभ्यासक्रम करू शकतात. वेगवेगळ्या पॉलिटेक्निक अभ्यासक्रमांचा कालावधी वेगवेगळा असतो.



### पॉलिटेक्निक अभ्यासक्रम काय आहेत ?

हा एक प्रकारचा तांत्रिक प्रशिक्षण डिप्लोमा कोर्स ( Technical Training Diploma Course ) आहे जो तांत्रिक कौशल्य अभ्यासक्रमाच्या श्रेणीत येतो. दहावी आणि बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थी दोन आणि तीन वर्षांच्या पॉलिटेक्निक अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकतात. पॉलिटेक्निक अभ्यासक्रमानंतर विद्यार्थ्यांना थेट बी.टेक.च्या द्वितीय वर्षात प्रवेश मिळू शकतो. देशात पॉलिटेक्निक अभ्यासक्रम करण्यासाठी अनेक सरकारी आणि खाजगी महाविद्यालये आहेत. अनेक राज्यांमध्ये पॉलिटेक्निक प्रवेशासाठी राज्यस्तरीय संयुक्त प्रवेश परीक्षाही घेतली जाते.

### पॉलिटेक्निक कोर्सला प्रवेश कसा घ्यावा ?


प्रत्येक राज्यात पॉलिटेक्निक डिप्लोमाच्या प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी करावी लागते. त्याची माहिती राज्यांच्या पॉलिटेक्निक कॉलेजांच्या अधिकृत वेबसाइटवर तपशीलवार दिली आहे. ऑनलाइन नोंदणीमध्ये नाव, पत्ता, बोर्डाचे नाव, गुणांचा तपशील असलेला ऑनलाइन अर्ज सादर केला जातो आणि त्यानंतर फी भरावी लागते. परीक्षेच्या काही वेळापूर्वी प्रवेशपत्र ऑनलाइन दिले जाते. पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश घेण्यासाठी लेखी परीक्षा असते.

### सरकारी नोकरीच्या संधी

पॉलिटेक्निक केल्यानंतर, गॅस अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड, भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड, भारत संचार निगम लिमिटेड, एनटीपीसी, एचसीएल, कोल इंडिया, इंडियन रेल्वे, ओएनजीसी, डीआरडीओ इत्यादी क्षेत्रांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. सार्वजनिक क्षेत्राप्रमाणे, अनेक खासगी क्षेत्रातील कंपन्या देखील पॉलिटेक्निक डिप्लोमा असलेल्या उमेदवारांना नियुक्त करतात.

### पॉलिटेक्निकमधील काही लोकप्रिय डिप्लोमा कोर्सेस

- कॉम्प्युटर सायन्स आणि इंजिनीअरिंग
- सिव्हील इंजिनीअरिंग
- ऑटोमोबाईल इंजिनीअरिंग
- इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन
- इलेक्ट्रीकल इंजिनीअरिंग
- इंटिरियर डेकोरेशन
- फॅशन इंजिनीअरिंग
- मेकॅनिकल इंजिनीअरिंग



## तुमची स्ट्रीम अन् आवड लक्षात घ्या...



**बारावीचा निकाल लागल्यानंतर विद्यार्थी पुढच्या करिअरबद्दल माहिती घ्यायला सुरुवात करतात. अनेक विद्यार्थ्यांच्या पालकांना याबद्दल माहिती नसते. बारावीनंतर योग्य करिअर पर्याय निवडणे सोपे नसते. अनेक विद्यार्थी समाजाच्या, पालकांच्या किंवा मित्रांच्या दबावाखाली आपल्या आवडीच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतात, पण नंतर त्यांना त्याचा अभ्यास करावासा वाटत नाही. याचा परिणाम त्यांच्या करिअरवर होऊ शकतो. त्यामुळे काही महत्वाच्या करिअरबद्दल जाणून घेऊया. एमबीबीएस, बीटेक, बीकॉम या पारंपारिक अभ्यासक्रमांशिवाय करिअरचे अनेक पर्याय आहेत, ज्यामध्ये बारावीनंतर प्रवेश घेता येतो. तुमची स्ट्रीम आणि आवड यानुसार तुम्ही त्यांचा अभ्यास करू शकता. कोणत्याही अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यापूर्वी त्याचा अभ्यासक्रम, अभ्यास साहित्य आणि नोकरीच्या पर्यायाची माहिती गोळा करावी.**

- इंजिनीअर होण्यासाठी बीटेक आवश्यक नाही : खूप मेहनत करूनही जर तुम्हाला आयआयटी, एनआयटीमध्ये प्रवेश मिळाला नसेल तर काळजी करू नका. तुम्ही गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॉलेजमधून ३ वर्षांचा डिप्लोमा कोर्स करू शकता. सरकारी विभागांमध्ये ज्युनिअर इंजिनीअर म्हणून डिप्लोमाधारकांना जास्त मागणी आहे. पॉलिटेक्निकमध्ये फार्मसी, जनसंपर्क, जाहिरात, फॅशन डिझायनिंग, हॉटेल मॅनेजमेंट यासारखे अभ्यासक्रमही शिकवले जातात.
- एमबीबीएसदेखील उत्तम पर्याय : देशभरातील सरकारी आणि खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी सुमारे १ लाख जागा आणि आयुषसाठी ५५ हजार जागा आहेत. या जागांसाठी सुमारे १५ लाख उमेदवार आहेत. बीव्हीएससी मध्ये नीट परीक्षेद्वारे प्रवेश देखील उपलब्ध आहे. हा पशुवैद्यकशास्त्राशी संबंधित अभ्यासक्रम आहे. याशिवाय बीएससी-नर्सिंग आणि पॅरा मेडिकल कोर्सेसही करता येतात.
- बी-फार्मामध्ये चांगला स्कोप : रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र (बी फार्मा कॉलेजेस) सह बारावी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षांचा बीफार्म कोर्स आहे. औषध उत्पादनात भारताची गणना अग्रेसर देशांमध्ये केली जाते. येत्या काही वर्षांत हा कोर्स करणाऱ्या तरुणांची मागणी वाढणार आहे. विद्यार्थी पदव्युत्तर आणि पीएचडी करून वैद्यकीय क्षेत्रात संशोधनही करू शकतात. सन्मानाच्या नोकरीसोबत कमाईच्या दृष्टिकोनातून हे क्षेत्र सर्वोत्तम आहे.
- बीसीए कॉम्प्युटर : कॉम्प्युटर इंजिनीअरिंगची आवड असलेल्या आणि बीटेकमध्ये प्रवेश घेता येऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना बीसीए करून आपले स्वप्न पूर्ण करू शकतात. काही संस्था बीसीएसाठी गणित आवश्यक मानतात. त्यामुळे कुठेही अर्ज करण्यापूर्वी ते तपासून पहा. कॉमर्स आणि आर्ट्स शाखेतील विद्यार्थीही यामध्ये प्रवेश घेऊ शकतात. अनेक संस्था बीसीए + एमसीए इंटिग्रेट अभ्यासक्रम देखील शिकवतात.

## बारावीनंतर सरकारी नोकरी करायची?

आपल्याकडे चांगल्या पगाराची नोकरी असावी असे प्रत्येकाला वाटत असते. काहीजण खासगी तर काही जण सरकारी नोकरीसाठी सातत्याने प्रयत्न करीत असतात. सरकारी नोकरीसाठी अनेकजण ग्रॅज्युएशननंतर स्पर्धा-परीक्षांची तयारी करतात. जितक्या लवकर आपण यासाठी तयारी करु तितक्या लवकर आपण आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकू. आपण यातील काही पर्याय जाणून घेऊया.

### भारतीय हवाई दल

हवाई दलात नोकरी करण्याची इच्छा असेल तर तुम्ही बारावी विज्ञान शाखेत उत्तीर्ण असणे गरजेचे आहे. यूपीएससीद्वारे एनडीए परीक्षा दरवर्षी दोनदा आयोजित केली जाते. ही परीक्षा ३ टप्प्यांत घेतली जाते. त्याचबरोबर या परीक्षेनंतर आणखी २ परीक्षा आहेत. पहिली पायलट ॲटिट्यूड बॅटरी टेस्ट आणि दुसरी कॉम्प्युटराइज्ड पायलट सिलेक्शन सिस्टीम. तुम्हाला ही परीक्षा उत्तीर्ण करावी लागेल.

### पोलीस हवालदार

पोलीस हवालदार या नोकरीसाठी बारावीनंतर अर्ज करू शकतात. या नोकरीसाठी तुम्हाला एसएससी जीडी किंवा स्टेट पोलीस कॉन्स्टेबल परीक्षा द्यावी लागेल. यासोबतच तुम्हाला शारीरिक चाचणी देखील उत्तीर्ण करावी लागेल.

### भारतीय सैन्य

बारावीनंतर तुम्ही भारतीय लष्करातील नोकरीसाठी अर्ज करू शकता. दरवर्षी भारतीय सैन्यात एक जागा रिक्त होते आणि तरुण या नोकरीसाठी अर्ज करतात. ही नोकरी अगदी सामान्य नोकरी आहे. त्याचप्रमाणे या नोकरीसाठी तुमचे मनोबल उच्च असणे आवश्यक आहे. भारतीय सैन्यात नोकरी मिळवायची असेल तर तुम्हाला लेखी परीक्षा द्यावी लागेल. त्यानंतर तुम्हाला एसएसबी मुलाखत द्यावी लागेल आणि नंतर वैद्यकीय चाचणी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.



# दिल्लीच्या विवेक विहारमध्ये अग्नीतांडव, चार मजली इमारतीला भीषण आग; नऊ जणांचा आगीत होरपळून मृत्यू



नवीदिल्ली(प्रतिनिधी)–दिल्लीच्या विवेक विहार भागातील एका चार मजली इमारतीला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. रविवार, दि. ३ मे रोजी पहाटेच्या सुमारास लागलेल्या या भीषण आगीत आतापर्यंत नऊ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर अन्य दोघे जण जखमी झाल्याचीही माहिती आहे. एसीमध्ये सॉर्टसर्किट झाल्याने ही आग लागल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. सध्या अग्निशमन दलाच्या वतीने आग पूर्णतः विझवण्याचे कार्य सुरु आहे. मात्र या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवार, दि. ३ मे रोजी पहाटे ४ वाजताच्या सुमारास इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर ही आग लागली, त्यानंतर आग विझवण्यासाठी आणि बचावकार्य करण्यासाठी अग्निशमन दलाच्या तब्बल १४ गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. मात्र आगीचे लोट पाहता तोपर्यंत आग इमारतीच्या तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यापर्यंत पसरल्याचे घटनास्थळी पोहोचल्यावर अधिकाऱ्यांना आढळून आले.

दरम्यान, इमारतीतून डझनहून अधिक लोकांना वाचवण्यात यश आल्याची माहिती अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी दिलीय. सध्या जखमींना उपचारासाठी गुरुतेग बहादूर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दोन तासांनंतर, सकाळी ६ वाजेपर्यंत आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. सध्या इमारतीचे अनेक भाग जळालेले आणि सर्वात वरच्या मजल्यावरून धूर बाहेर येताना दिसत आहे. पहाटे सुमारे ४ वाजता आग लागल्याचा फोन आला. अग्निशमन दलाच्या गाड्या आणि स्थानिक पोलिसांना तात्काळ घटनास्थळी पाठवण्यात आले. आग नियंत्रणात आणायला सुमारे दोन तास लागले, त्यानंतर शोधमोहीम राबवण्यात आली, अशी माहिती शाहदराचे डीसीपी राजेंद्र प्रसाद मीना यांनी दिली आहे.

स्थानिक नगरसेवक पंकज लुथरा यांच्या माहितीनुसार, 'माहिती मिळताच मी घटनास्थळी धाव घेतली. मी नुकताच वरच्या मजल्यांवरून खाली आलो आहे. दुसऱ्या मजल्याच्या मागील भागात पाच मृतदेह आढळले. आणखी एक मृतदेह मागील भागात आणि तीन मृतदेह सर्वात वरच्या मजल्यावर आढळले. सध्या ओळख पटवणे अशक्य आहे. आम्ही अजूनही पुढील तपास करत आहोत, परंतु डीएनए चाचणी होईपर्यंत आम्ही पीडितांचे ओळख निश्चित करू शकणार नाही. एकूण नऊ मृतदेहांची पुष्टी झाली आहे. आम्ही अजूनही अधिक लोकांचा शोध घेत आहोत. शॉर्ट सर्किटमुळे हे घडले असावे असे लोक म्हणत आहेत, परंतु घटनेच्या नेमक्या कारणाबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

# वेरूळ लेणीमध्ये मधमाशांचा हल्ला; १०० पर्यटक जखमी, एकाची प्रकृती गंभीर



छत्रपती सांभाजीनगर(प्रतिनिधी)–वेरूळ लेणी परिसरात आज एक धक्कादायक घटना घडली. सुट्ट्या असल्यामुळे मोठ्या संख्येने पर्यटक लेणी पाहण्यासाठी आले असताना अचानक मधमाशांनी हल्ला केला. या घटनेत सुमारे १०० पर्यटक जखमी झाले असून, एका महिला पर्यटकाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे.

मे महिन्यातील सलग सुट्ट्यांमुळे राज्यासह इतर भागांतूनही हजारो पर्यटक वेरूळ लेणी पाहण्यासाठी आले होते. लेणी क्रमांक १६ (कैलास लेणी) आणि लेणी क्रमांक १० परिसरात मोठी गर्दी असतानाच अचानक मधमाशांचे पोळे हलले आणि मधमाशांनी पर्यटकांवर हल्ला केला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि स्वतःचा बचाव करण्यासाठी सर्वत्र धावपळ उडाली. या हल्ल्यात अनेकांना मधमाशांनी चावे घेतले. जखमींपैकी एका महिलेला मोठ्या प्रमाणात दंश झाल्याने तिची प्रकृती चिंताजनक असून तिला तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, भारतीय पुरातत्व विभाग आणि स्थानिक प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून काही काळासाठी त्या परिसरातील प्रवेश बंद केला आहे. सुट्टीच्या हंगामात घडलेल्या या प्रकारामुळे पर्यटकांच्या सुरक्षेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# मे महिन्यासाठी हवामान विभागाचा अंदाज जाहीर



पुणे (प्रतिनिधी) –'आयएमडी'च्या विस्तारित अंदाजानुसार, मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात (१४ ते २१ मे) हिंदी महासागरावर नैऋत्य मोसमी वाऱ्यांचा जोर वाढण्याची शक्यता असून, याच काळात अंदमान-निकोबार बेटांवर मान्सून दाखल होऊ शकतो. अंदमान-मध्ये मान्सून दाखल होण्याची सर्वसाधारण तारीख २२ मे आहे. केरळमधील मान्सूनच्या आगमनाची तारीख १५ मेच्या दरम्यान असून, मान्सूनचा सुधारित दीर्घकालीन अंदाज मे अखेरीस जाहीर करण्यात येणार आहे.

देशात यंदा एप्रिलमध्ये तीव्र स्वरूपाचा उन्हाळा अनुभवायला मिळाला असला, तरी मे महिन्यात मात्र, कमाल तापमान काहीसे दिलासादायक राहण्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) वर्तवला आहे.

'आयएमडी'चे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी शुक्रवारी ऑनलाइन पत्रकार परिषदेत मे महिन्याचा हवामान अंदाज जाहीर केला. एप्रिलअखेरीस महाराष्ट्रासह मध्य आणि उत्तर भारतात सुरू झालेले उष्णतेच्या लाटांचे सत्र चालू आठवड्यात कमी होणार असल्याची शक्यता डॉ. महापात्रा यांनी वर्तवली. ते म्हणाले, 'मे महिन्यात पश्चिमी वाऱ्यांच्या प्रभावामुळे; तसेच दक्षिण भारतातील वादळी पावसामुळे सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता आहे. ढगाळ हवामानाचे दिवस जास्त राहण्याची शक्यता असल्याने देशाच्या बहुतांश भागांमध्ये कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी, तर रात्रीचे तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. रात्रीचे तापमान जास्त राहिल्याने उकाड्यात मात्र, वाढ होऊ शकते.'

'आयएमडी'च्या मासिक हवामान अंदाजानुसार, कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याचा काही भाग वगळता राज्यात इतरत्र कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता जास्त आहे. विदर्भ वगळता इतर विभागांमध्ये किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. धुळे, नंदुरबारपासून कोल्हापूर, सांगलीपर्यंतच्या मध्य महाराष्ट्राच्या पट्ट्यात मे महिन्यात उष्णतेच्या लाटांचे दिवस सरासरीपेक्षा जास्त राहू शकतात.

**केरळमध्ये मुसळधार पावसाची हजेरी**

केरळच्या काही भागांत शनिवारी मुसळधार पावसाने हजेरी लावली. यामुळे भारतीय हवामान विभागाने राज्याच्या एर्नाकुलम, त्रिशूर, इडुक्की आणि मलप्पुरम या जिल्ह्यांसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी केला. या आठवड्याच्या सुरुवातीलाच, हवामान विभागाने मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली होती. 'ऑरेंज अलर्ट' हा अतिमुसळधार पावसाचे संकेत देतो. केरळ राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने शनिवारी दुपारी १ वाजेपर्यंत राज्यात अतिनील किरणांची पातळी उच्च असल्याचे नोंदवले गेले. पतनमथिट्टा जिल्ह्यातील कोन्नी आणि इडुक्की जिल्ह्यातील मुन्नार येथे अतिनील किरणांची पातळी '८' पेक्षा जास्त असल्याचे नोंदवले गेले; ही पातळी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यासाठी पुरेशी मानली जाते.

# सेल्फीचा नाद जीवावर बेतला; २ दिवसांत ६ जणांचा बुडून मृत्यू

पुणे (प्रतिनिधी) –मावळ तालुक्यात दोन दिवसांत सहा जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या दुर्घटना तीन वेगवेगळ्या ठिकाणी घडल्या असून, कामगार दिनी तीन कामगारांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

जाधववाडी येथे सेल्फी काढण्याच्या नादात तिघे मित्र बुडाले. अजय गारुडे, अनिकेत पवार आणि संतोष येडके (तिघेही रा. भोसरी) अशी त्यांची नावे आहेत. वलवण धरणात योगेश पालवे (वय ३०, रा. कुरवंडे, लोणावळा), यश कुलदीप धनोरिया (वय १३, रा. लोणावळा) यांचा मृत्यू झाला. मनोज भारत गौतम (वय २५, मूळ रा. उत्तर प्रदेश) असे पवन मावळातील साळुंब्रे गावच्या हद्दीत पवना नदी पात्रात बुडून मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

अजय गारुडे, अनिकेत पवार आणि संतोष येडके हे तीन मित्र भोसरी एमआयडीसीत एका खासगी कंपनीत कामाला होते. मूळचे परभणीचे असलेले हे तरुण अन्य मित्रांसोबत एक मे च्या कामगार दिनाच्या सुट्टीचे औचित्य साधून फिरायला गेले होते. दुपारी तीनच्या सुमारास तिघांनीही धरणात उतरून पोहण्याचा निर्णय घेतला आणि पोहण्याचा आनंद लुटू लागले. पोहताना त्यांनी पाण्यात एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवत सेल्फी काढू लागले. यावेळी सेल्फी काढणाऱ्याचा पाय निसटला आणि तो पाण्यात बुडू लागला. त्याच्या मित्रांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न करत असताना तेही खोल पाण्यात खेचले. त्या तीन मित्रांचा इतर मित्रांच्या डोळ्यादेखत धरणाच्या खोल पाण्यात बुडाले. त्यांच्या इतर मित्रांनी त्यांना वाचवण्यासाठी आरडाओरड केला. आरडाओरडा ऐकून स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली; परंतु तोपर्यंत उशीर झाला होता. दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आपत्कालीन पथकाला तिघांचे मृतदेह बाहेर काढण्यात यश आले.

याच दिवशी साळुंब्रे गावच्या हद्दीत पवना नदीत पोहण्यासाठी गेलेल्या मनोज गौतम या तरुणाचाही बुडून मृत्यू झाला. तर, गुरुवारी (३० एप्रिल) लोणावळ्याजवळील कुरवंडे येथील योगेश पालवे आणि एका विद्यालयातील सातवीच्या वर्गात शिकणारा १३ वर्षीय विद्यार्थी यश धनोरिया हा हरविल्याची तक्रार दाखल केली होती. हा विद्यार्थी आपल्या दोन मित्रांसह फिरायला जात असल्याचे विद्यालयातील सीसीटीव्हीत दिसत होते. त्या अनुषंगाने यंत्रणेने त्याच्या मित्रांना विश्वासात घेऊन विचारपूस केली असता ते विद्यालयापासून काही अंतरावर असलेल्या वलवण धरणाकडे फिरायला गेले असल्याचे समजले. मित्रांनी सांगूनही त्याने त्यांच्या ऐकण्याकडे दुर्लक्ष करून पोहण्यासाठी पाण्यात उतरला आणि त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. पथकाने दोघांचे मृतदेह बाहेर काढले.

दरम्यान, उन्हाळ्यामुळे सध्या नद्या, धरणे, ओढे नाले व इतर जलस्रोताच्या ठिकाणी गर्दी होऊ लागली आहे आहे. मात्र, अशा ठिकाणच्या जलस्रोताच्या पाण्याच्या तळातील खोलीचा अंदाज येत नसल्याने आणि नदीतील पाण्याच्या प्रवाहाचा व खोलीचा अंदाजाची माहिती नसल्यामुळे असे जीवघेणे अपघात घडत आहेत

उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये धरण, नदी परिसरात फिरताना विशेष काळजी घ्यावी. पाण्याची खोली, प्रवाह आणि सुरक्षिततेची साधने यांची खात्री करूनच पाण्यात उतरावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# शिक्षक केवळ वाचायला शिकवत नाही, तर समाज घडवतो आणि वाचवतो –राहुल नार्वेकर यांचे गौरवोद्गार



मुंबई(प्रतिनिधी)–शिक्षक हा केवळ अक्षरांची ओळख करून देणारा घटक नाही, तर तो खऱ्या अर्थाने समाज घडवणारा आणि संकटाच्या काळात समाजाला वाचवणारा शिल्पकार आहे, अशा शब्दांत महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी एकल शिक्षकांच्या कार्याचा गौरव केला. मुंबईतील ऐतिहासिक गेटवे ऑफ इंडिया येथे आयोजित 'कर्मयोगी एकल शिक्षक मेळावा २०२६' प्रसंगी ते बोलत होते. या सोहळ्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांसारख्या दिग्गज मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या भाषणात नार्वेकर यांनी भारताच्या आर्थिक प्रगतीवर भाष्य करताना सांगितले की, भारत आज जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. २०४७ पर्यंत भारताला पूर्णपणे 'विकसित राष्ट्र' बनवण्याचे जे स्वप्न आपण पाहत आहोत, ते पूर्ण करण्यासाठी आपल्या युवा पिढीला 'कुशल युवा' मध्ये रूपांतरित करणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे. शिक्षकांमुळेच समाजातील विचार प्रगल्भ होतात आणि कोणताही समाज तोपर्यंत प्रगत करू शकत नाही, जोपर्यंत शिक्षणाची संधी शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

राहुल नार्वेकर यांनी मानकर ट्रस्टच्या कार्याचे कौतुक करताना मार्टिन ल्यूथर किंग ज्युनिअर यांच्या प्रसिद्ध विचारांचा दाखला दिला. ते म्हणाले की, मला वाईट प्रवृत्तींच्या हिंसेची भीती वाटत नाही, तर चांगल्या लोकांच्या शांत राहण्याची भीती वाटते. मात्र, मानकर ट्रस्ट आणि त्यांचे एकल शिक्षक शांत न बसता राज्याच्या अतिदुर्गम भागात जाऊन जे सामाजिक परिवर्तनाचे कार्य करत आहेत, ते खरोखरच वंदनीय आहे. समाजातील शेवटच्या स्तरावर असलेल्या आणि मुख्य प्रवाहापासून वंचित असलेल्या आदिवासी बांधवांना शिक्षणाशी जोडणे, हे कार्य खऱ्या अर्थाने 'अंत्योदय' संकल्पना पूर्ण करणारे आहे.

हा भव्य सोहळा आपल्या स्वतःच्या विधानसभा मतदारसंघात पार पडत असल्याबद्दल त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला. नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतुल शिरोडकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या कार्यामुळे आदिवासी भागातील चित्र झपाट्याने बदलत असून, हा मेळावा आगामी काळात संपूर्ण समाजासाठी एक दीपस्तंभ ठरेल, असा विश्वास राहुल नार्वेकर यांनी यावेळी व्यक्त केला.

# घरगुती सिलेंडरच्या किंमतीतही वाढ



मुंबई (प्रतिनिधी)–गेल्या १५ वर्षांत घरगुती गॅस सिलेंडरच्या किंमतींमध्ये मोठी वाढ झाली असून त्या दुपटीहून अधिक झाल्या आहेत. आधीच महागाईचा भार सहन करणाऱ्या सर्वसामान्यांसाठी ही चिंतेची बाब ठरत आहे. गेल्या महिन्यात ६० रुपयांची वाढ झाल्यानंतर आता पुन्हा दरवाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

१ मे रोजी व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या दरात तब्बल ९९३ रुपयांची वाढ करण्यात आली, ज्याचा थेट परिणाम हॉटेल आणि खानावळींच्या खर्चावर होण्याची शक्यता आहे. परिणामी, बाहेर जेवण महाग होण्याची शक्यता असून नोकरदार वर्ग आणि विद्यार्थ्यांच्या खर्चात वाढ होऊ शकते.

सूत्रांच्या माहितीनुसार, घरगुती एलपीजी सिलेंडरच्या दरात ४० ते ५० रुपयांची वाढ होऊ शकते. सध्या सिलेंडरचे दर आधीच १००० रुपयांच्या आसपास पोहोचले आहेत. अशा परिस्थितीत आणखी दरवाढ झाल्यास सर्वसामान्यांचे मासिक बजेट विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

गॅस दरवाढीचा सर्वाधिक फटका गृहिणींना बसण्याची शक्यता आहे. वाढत्या खर्चामुळे अनेक कुटुंबांना पर्यायी उपायांचा विचार करावा लागू शकतो. काही ठिकाणी पारंपरिक चुलीचा वापर पुन्हा वाढेल का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

दरम्यान, जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किंमतींमध्ये सातत्याने चढ-उतार होत आहेत. याचा परिणाम देशातील इंधन दरांवर होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत सरकारने कर कमी करून महागाईचा ताण कमी करण्याचा प्रयत्न केला होता, मात्र जागतिक परिस्थितीमुळे भविष्यात पेट्रोल, डिझेल आणि गॅस दरवाढीची शक्यता नाकारता येत नाही.

जरी पेट्रोलियम मंत्रालयाने तातडीने दरवाढ होणार नसल्याचे संकेत दिले असले, तरी व्यावसायिक गॅसनंतर घरगुती गॅसही महागण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# विदर्भात साकारणार देशातील पहिले आदिवासी विद्यापीठ

## ५०० कोटींच्या प्रकल्पातून शैक्षणिक क्रांतीचे नवे पर्व

मुंबई(प्रतिनिधी) –गेल्या तीन दशकांपासून आदिवासी आणि दुर्गम भागात शिक्षणाची गंगा पोहोचवणाऱ्या 'कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेने' आता आपल्या कार्याचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रभर करण्याचा मोठा संकल्प केला आहे. संस्थेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली विदर्भात देशातील पहिले 'आदिवासी विद्यापीठ' उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या ५०० कोटी रुपयांच्या भव्य प्रकल्पासाठी राज्य शासनाकडे २०० एकर जमिनीची मागणी करण्यात आली असून, त्यातील १५० कोटी रुपये 'व्हिसा' आणि 'मास्टरकार्ड' सारख्या जागतिक कंपन्यांच्या CSR निधीतून, तर उर्वरित ३५० कोटी रुपये लिस्टिंगच्या माध्यमातून उभे केले जाणार आहेत. कामात पारदर्शकता आणण्यासाठी बॉम्बे स्टॉक एक्सचेंजवर ट्रस्टची नोंदणी करण्यात आली



आहे. सोबतच, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून राज्यातील ९३ तालुक्यांमध्ये 'एकल हब' उभारले जातील, ज्याद्वारे सॅटेलाइट आणि दृक-श्राव्य माध्यमांतून अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचवले जाईल. नागपूर येथील पहिल्या 'एकल हब'च्या उद्घाटनानंतर आता हे जाळे संपूर्ण महाराष्ट्रात विस्तारले जाणार आहे.

दुसरीकडे, संस्थेने मुंबई महानगर-पालिकेसोबतही शैक्षणिक भागीदारी केली असून पालिकेच्या शाळांमधील शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. या सामाजिक चळवळीला बळकट करण्यासाठी संस्थेने 'एक रुपया' दानाचे अभिनव आवाहन केले असून, क्यूआर कोडद्वारे संकलित होणारा हा निधी आदिवासी भागातील 'बांबू लागवडीच्या' प्रकल्पासाठी वापरला जाणार आहे. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेनुसार, हा बांबू कोळशाला पर्याय म्हणून जैविक इंधन निर्मितीसाठी उपयुक्त ठरेल, ज्यामुळे प्रदूषणावरही नियंत्रण मिळेल. येणाऱ्या काळात आपल्या एकल विद्यालयांची संख्या १,३२२ वरून ५,००० पर्यंत नेण्याचे आणि सुमारे १ लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे मोठे ध्येय संस्थेने ठेवले आहे. मुंबई पोलीस, महानगरपालिका आणि शिक्षण समितीच्या अध्यक्षा राजश्री शिरवाडकर यांच्या सहकार्याने सुरू असलेले हे कार्य आता सोशल मीडियाच्या माध्यमातूनही जनमानसात पोहोचवले जात असून, आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही संस्था आता नव्या जोमाने सज्ज झाली आहे.

# राज्यात दिवसाला २४ अत्याचार; तासाला एक, रोहित पवारांनी मांडली हादरवणारी आकडेवारी

पुणे (प्रतिनिधी)–जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर गावात चार वर्षाच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिला संपवण्यात आल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. यामुळे आज नसरापूर गावात कडकडीत बंद पुकारण्यात आला आहे. ग्रामस्थांनी घटनेबद्दल संताप व्यक्त करत नराधमाला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. या आज राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी पीडित कुटुंबियांची भेट घेतली. यानंतर माध्यमांशी संवाद साधताना रोहित पवार यांनी महाराष्ट्रात शक्ती कायदा लागू करण्याची मागणी केलीय.

रोहित पवार पत्रकार परिषदेत म्हणाले की, काल जो लोकांचा आक्रोश पाहायला मिळाला, तो योग्यच होता. अशी एखादी घटना घडत असेल तर लोक चिडणारच आहेत. काल एसपी साहेबांशी सुप्रिया ताईंनी चर्चा केली. मी आज एसपी साहेबांशी बोललो. हा क्रिमिनल दोन वेळेस अशाच प्रकारच्या घटनेत पकडला गेला होता पण बेलवर तो बाहेर आला. तिसरी घटना करण्याचे त्याचे धाडस झालेच कसे? उद्या जर हा परत बेल घेऊन बाहेर येणार असेल तर या कायद्याचे करायचे काय? अशी येथील लोकांची भावना आहे. पोलिसांनी समजावून सांगितल्यानंतर लोकांनी मान्य केले आहे.

१९८३ मध्ये सुप्रीम कोर्टचा एक निकाल आहे. ज्यात कॅपिटल पनिशमेंट म्हणजे क्रिमिनलचा मृत्यू झाला पाहिजे, अशी मागणी सरकारने केली होती. तसेच, या घटनेमध्ये जो गुन्हेगार आहे त्याला फाशीची शिक्षा पुढच्या काही दिवसात मिळू शकते. लोकांची आणखी एक भूमिका आहे की, मुलीच्या आईला आर्थिक मदत सरकारकडून मिळाली पाहिजे. त्या महिलेला शासकीय नोकरी देण्यात यावी, अशा मागण्या येथील लोकांनी केलेल्या आहेत, असे रोहित पवार म्हणाले.


## टी. सी. हरवली

माझी प्रवीण रामराव गांजुरे या नावाची इयत्ता दहावी पासची टी. सी. तरोडा नाका ते बसस्टँड दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे. ज्यांना कुणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर आणून द्यावी ही विनंती.

पत्ता-प्रवीण रामराव गांजुरे
वृंदावन कॉलनी, नांदेड मो. ८८८८९१९८८०


## टी. सी. हरवली

माझी केदार शंकर सरकाळे या नावाची इयत्ता तिसरी पासची टी. सी. बसस्टँड ते यशवंतनगर दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे. ज्यांना कुणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर आणून द्यावी ही विनंती.

पत्ता-शंकर बाबुराव सरकाळे
यशवंतनगर, नांदेड मो. ९४२१८४९१३८

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६


# गोदातीर समाचार


**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



### अवैध व्यवसाय विरोधी मोहीम

## नांदेड परिक्षेत्रात दुसऱ्या दिवशी २५ गुन्हे दाखल, २८ जणांविरुद्ध कारवाई, १६ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

नांदेड (प्रतिनिधी)- पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी, दिनांक १ ते ३१ में, २०२६ दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध दारू, गुटखा, मटका, जुगार, अंमली पदार्थ, घातक शस्त्रे इत्यादी विरोधी मोहिम राबविण्याचे निश्चित केले आहे.

सदर मोहिमेच्या दुसऱ्या दिवशी नांदेड परिक्षेत्रात, महाराष्ट्र जुगार कायद्याअंतर्गत (१०) इसमांविरुद्ध कारवाई करून त्यांचेविरुद्ध (७) गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून १ लाख ३६ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर, अवैध दारू विक्री करणाऱ्या (१२) आरोपींविरुद्ध (१२) गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून १ लाख २० हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, यासोबतच,



अंमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत २ लाख रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला असून, शस्त्र अधिनियम, कोटपा इत्यादी अधिनियमाखाली दिवसभरात एकूण (२५) कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून १६ लाख ५२ हजार ९७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

'खबर' हेल्पलाइन ची मोठी मदत अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना देता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवावी, असे आवाहन करण्यात आले होते. सदर हेल्पलाइनवर नागरिकांनी विश्वास दर्शविला असून, परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी सदर हेल्पलाइनची मोठी मदत होत असल्याचे, पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

### भाग्यनगर पोलिसांची जुगार अड्ड्यावर कारवाई

## साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त, नऊ जणांना केली अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील भाग्यनगर पोलिसांनी ऑपरेशन क्रॅक डाउन अंतर्गत कारवाई करीत जुगार अड्ड्यावर छापा टाकून ४ लाख ५२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई भाग्यनगर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने केली.



पोलीस उपअधीक्षक रामेश्वर व्यंजने, सहायक पोलीस अधीक्षक शशांथ गौडा, पोलीस निरीक्षक संतोष तांबे, महेश माळी, गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख, नरेश वाडेवाले, पोलीस अंमलदार विशाल माळवे, विष्णुकांत गुट्टे, सुधाकर मरदोडे, राहुल लाठकर, नागनाथ चापके, राजीव घुले, अदनान पठाण, अंकुश कांबळे व त्यांच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, तरोडा बु. परिसरातील अरुणोदयनगरमध्ये लक्ष्मण पान शॉपजवळ काही जुगारी जुगार खेळत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी तत्काळ छापा टाकून घटनास्थळी कारवाई केली. यावेळी ९ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून रोख रक्कम २२ हजार ५०० रुपये, जुगार साहित्य, ६ दुचाकी व ७ मोबाईल फोन असा एकूण ४ लाख ५२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पकडण्यात आलेल्या जुगाऱ्यां– मध्ये गौतम दौलत जोंधळे (वय २५), अजिजखान इस्माईल खान पठाण (वय ३५), राहुल गणपत मोरे (वय २३), सागर उत्तमराव सूर्यवंशी (वय ३०), लक्ष्मण उत्तमराव चिंचोके (वय ३५), स्वप्नील प्रकाश गजभारे (वय ३२), अतु भाऊराव कवडे (वय ३२), विठ्ठल गोविंद धोत्रे (वय ३८), नंदकिशोर प्रल्हाद कदम (वय ३०) यांचा समावेश आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ऑपरेशन क्रॅकडाउन अंतर्गत पोलिसांची इस्लापूर परिसरात अवैध दारू विरोधात कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्हा पोलीस दलामार्फत ग्रामीण भागामध्ये अवैध दारू निर्मिती, विक्री व त्यातून उद्भवणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या ऑपरेशन क्रॅकडाउन अंतर्गत रविवार, दि. ३ मे रोजी इस्लापूर हद्दीतील शिवनी व आजूबाजूच्या दुर्गम परिसरात मोठ्या प्रमाणावर नियोजनबद्ध व समन्वयातून विशेष कारवाई करण्यात आली.

सदर गावामध्ये हातभट्टी दारू निर्मितीची प्रवृत्ती पूर्वीपासून आढळून येत असल्याने, या परिसराचा सखोल अभ्यास करून अत्यंत गोपनीय व काटेकोर नियोजनाद्वारे पहाटे ४ वाजल्यापासून ही कारवाई सुरू करण्यात आली. या संयुक्त कारवाईमध्ये इस्लापूर पोलीस तसेच बाहेरून एक अतिरिक्त पोलीस अधीक्षक, १० अधिकारी, १०५ पोलीस



अंमलदार तसेच २ आरसीपी प्लाटून यांनी सहभाग घेतला होता.

मोहमास सडवा १७ हजार २५० लिटर अंदाजे किंमत ८ लाख ६२ हजार ५०० रुपये, हातभट्टी दारू १६६ लिटर अंदाजे किंमत १६ हजार रुपये, मोहफुले १ हजार ५०० किलो अंदाजे किंमत ४५ हजार, रसायनमिश्रित सिंधी २ गुन्हे, २ हजार ७०० लिटर अंदाजे किंमत ५४ हजार, गुटखा संदर्भात १ कारवाई किंमत ४८ हजार ८४० रुपये अशाप्रकारे एकूण अंदाजे १० लाख २६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, याशिवाय अवैध वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली वाहने जप्त करण्याची कार्यवाहीही सुरू आहे. सदर प्रकरणात आतापर्यंत एकूण २५ आरोपी निष्पन्न झाले असून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईदरम्यान गावातील अनेक नागरिक तसेच महिला भगिनींनी पोलीस प्रशासनाला मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या सकारात्मक सहभागाबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

नांदेड जिल्हा पोलीस नागरिकांना आवाहन करीत आहेत की, अंमली पदार्थ, अवैध दारू, आर्म्स, जुगार तसेच इतर बेकायदेशीर कृत्यांबाबत कोणतीही माहिती असल्यास ती आपल्या स्थानिक पोलीस ठाण्यास किंवा ११२ helpline वर तत्काळ कळवावी. माहिती देणाऱ्याची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल.

## महाराजस्व शिबिरामुळे जनतेची सोय – आ. बोंढारकर

### शोध वंचित लाभार्थ्यांचा उपक्रमाचा गौरव

**नांदेड (प्रतिनिधी)** – छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराच्या माध्यमातून जनतेची कामे तत्काळ होत असल्याने जनतेची सोय होत आहे, असे मत नांदेड दक्षिण विधानसभेचे आमदार आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांनी केले. दरम्यान, या शिबिराच्या माध्यमातून शोध वंचित लाभार्थ्यांचा हा विशेष उपक्रम राबवून लाभार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येणार असल्याने सम ाधान व्यक्त केले. तसेच या उपक्रम ाचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्रमांक १ अंतर्गत नांदेड तालुक्यातील वाजेगाव महसूल मंडळात ३० एप्रिल रोजी वाजेगाव येथे आयोजित शिबिराचे उद्घाटन आमदार आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर तहसीलदार संजय वारकड, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण मुंडे, नायब तहसीलदार महसूल सुनील माचेवाड, पुरवठा निरीक्षण अधिकारी रवींद्र राठोड, राष्ट्रमाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वाजेगावचे



प्राचार्य तुकाराम गाडेकर, डॉ. पाईकराव, डॉ. अमजद, बाळू पाटील ब्राम्हणवाडेकर, पिंटू पाटील शिंदे, सरपंच जमील सेठ, दत्ता जाधव, हनुमंतराव पुयड, उत्तमराव पुयड, मंडळ कृषी अधिकारी सुनील सानप आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

आमदार बोंढारकर यावेळी बोलताना म्हणाले की, महाराजस्व शिबिराच्या माध्यमातून शासन आपल्या दारी या शिबिरातून विद्यार्थी, शेतकरी, सर्वसामान्य जनता व शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना लाभ देण्याचे काम मोठ्या प्रमाणावर होत आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम शासन करीत असल्याचे ते यावेळी म्हणाले. या शिबिराच्या माध्यम ातून शोध वंचित लाभार्थ्यांचा या उपक्रमामुळे लाभार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना लाभ देण्यात येत असल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.

## मूल्यमापन समितीवर पत्रकार राजीव ताटे

**देगलूर (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अंतर्गत देगलूर पंचायत समितीची तालुका पातळीवरील मूल्यमापन समिती दि. ४ मेपासून चंद्रपूर दौऱ्यावर जाणार आहे, या समितीमध्ये पत्रकार राजीव बापूराव ताटे यांची निवड करण्यात आली असून, चंद्रपूर जिल्ह्यातील पंचायत राज व्यवस्थेतील विविध यशस्वी उपक्रम ग्रामविकास योजना व प्रशासनाची कार्यप्रणालीचा आढावा घेऊन वस्तुनिष्ठ मूल्यमापन करणार आहे.

## मानवतेला काळीमा फासणारी घटना, आजच्या निदर्शनामध्ये सहभागी व्हावे –निखिल लातूरकर

**नांदेड (प्रतिनिधी)** – नसरापूर येथे एका अल्पवयीन चिमुरडीवर झालेल्या अमानुष अत्याचाराच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून, राज्यभरातून संतापाची तीव्र लाट उसळली आहे. या क्रूर कृत्याच्या निषेधार्थ अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ (महाराष्ट्र राज्य) आक्रमक झाला असून, आरोपींना तातडीने मृत्युदंडाची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली आहे.

सोमवार, दि. ४ मे रोजी नांदेड येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकाळी साडेदहा वाजता अखिल भारतीय ब्राह्मण म हासंघातर्फे निदर्शने आयोजित करण्यात आली आहेत अशी माहिती प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी दिली आहे.



या निदर्शनामध्ये सर्व सम ाज बांधवांनी उपस्थित राहावे व या घटनेचा निषेध करून आरोपीला तत्काळ फाशी व्हावी यासाठी सरकारने उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली आहे.

निखिल लातूरकर यांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त करीत, ही घटना माणुसकीला काळिमा फासणारी असून अशा नराधमांना समाजात जगण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यांना लवकरात लवकर फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे, अशी कठोर भूमिका मांडली. त्यांनी यापूर्वी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता; मात्र राज्य शासनाने तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केल्याने पुढील न्यायप्रक्रियेवर लक्ष केंद्रित करण्याची भूमिका महासंघाने घेतली आहे.

या प्रकरणी महासंघाने प्रशासनाकडे काही महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. यामध्ये खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून तातडीने निकाल देणे, आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देणे आणि पीडित कुटुंबाला संपूर्ण संरक्षण व मदत उपलब्ध करून देणे यांचा समावेश आहे. अशा घटनांना आळा बसावा यासाठी कायद्याचा धाक निर्माण होणे अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

पीडित कुटुंबाला न्याय मिळालाच पाहिजे या घोषणेसह राज्यभर निषेध व्यक्त केला जात असून, नागरिकांमध्येही प्रचंड रोष आहे. या घटनेने समाजमन हादरले असून, आता सर्वांच्या नजरा न्यायालयीन प्रक्रियेवर खिळल्या आहेत. पीडितेला न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच राहणार, असा निर्धार अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाने केला आहे.

## प्रियकराच्या जाचास कंटाळून महिलेची आत्महत्या

**देगलूर (प्रतिनिधी)** –शहरातील जोशी गल्लीतील रहिवासी ३८ वर्षीय महिलेने शारीरिक व मानसिक छळाला वैतागून येथील भायेगाव रस्त्यावरील लेंडी नदीच्या पात्रात उडी घेऊन जीवन यात्रा संपवली असल्याचे सांगण्यात येते.

दहा वर्षापूर्वी या महिलेच्या पतीचे निधन झाले. ही महिला गत पाच वर्षांपासून सिद्धार्थ नगरातील धम्मपाल यादवराव सोनकांबळे यांच्यासोबत राहत होती. धम्मपाल सोनकांबळे हा नशा पाणी करून या महिलेस सतत मारझोड करून मानसिक त्रास देत होता असे तक्रारीत म्हटले आहे. या छळास कंटाळून सदरील महिलेने शुक्रवारी लेंडी नदीच्या पात्रात उडी घेतली. मृत महिलेचा भाऊ अंकुश कांबळे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी धम्मपाल यादवराव सोनकांबळे विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## 'द महाराष्ट्र अर्थ सायन्स PYQ's कॉम्पेंडिअम' पुस्तकाचे प्रकाशन

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून स्थानिक नांदेड एज्युकेशन सोसायटी संचालित सायन्स कॉलेज, नांदेड येथे महाविद्यालयातील अधिव्याख्याते आणि संशोधक प्रा. आकाश करंडे लिखित भूशास्त्र विषयातील अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या 'The Maharashtra Earth Science PYQ's Compendium' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. या पुस्तकाचे प्रकाशन नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजवंदनानंतर हा सोहळा संपन्न झाला. यावेळी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड. प्रफुल अग्रवाल, सचिव प्रा.



श्यामल पत्की, सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे, उपप्राचार्य प्रा. एम. खिल्लारे, उपप्राचार्या डॉ. अरुणा शुक्ला यांची प्रमुख उपस्थिती होती.

हे पुस्तक प्रामुख्याने स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या भूशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आले असून, यात विविध परीक्षांमध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नांचा सखोल संग्रह करण्यात आला आहे. भूगर्भशास्त्र, खनिजशास्त्र आणि महाराष्ट्राची भौगोलिक रचना या विषयांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक अत्यंत दिशादर्शक ठरेल, असा विश्वास मान्यवरांनी यावेळी व्यक्त केला.

या प्रकाशन सोहळ्याला महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. बैनवाड, प्रबंधक गौतम वाघमारे, भूशास्त्र विभाग प्रमुख डॉ. के. आर. गायकवाड यांच्यासह प्रा. पवार, प्रा. राजेश आचेगावे, प्रा. डॉ. विनोद चव्हाण, प्रा. जोशी, प्रा. अंकिता वडजे, प्रा. प्रतीक्षा सुर्वे, प्रा. खुरांगे, प्रा. निलवर्ण आणि प्रा. पाटील यांची उपस्थिती होती.

## गुरुद्वारा तख्त सचखंड बोर्डातर्फे ७१ वा सामुहिक विवाह महोत्सव संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)**– सामाजिक परिवर्तनाची बांधीलकी म्हणून गुरुद्वारा सचखंड बोर्डातर्फे दरवर्षी सामुहिक विवाह मेळावे घेण्यात येतात. आतापर्यंत एकूण ७० विवाह मेळावे संपन्न झाले आहेत. यामध्ये जवळ-जवळ २४०० हुन अधिक जोपड्यांचे विवाह गुरुद्वारा बोर्डातर्फे करण्यात आले आहेत. यावर्षीही २-३ मे रोजी सकाळी ११:३० वाजता श्री गुरु ग्रंथ साहिबजी भवन येथे पंजप्यारे साहिबान व इतर प्रमुख अतिथींच्या उपस्थितीत विवाह मेळावा पार पडला. यामध्ये देशातल्या विविध भागातून सामुहिक विवाह मेळाव्यात विवाहबद्ध होण्यासाठी १३ जोडपे सहभागी झाली होती.

यावेळी गुरुद्वारा सचखंड बोर्डाचे प्रशासक विजय सतबीरसिंघ यांच्या मार्गदर्शनाखाली हा विवाह सोहळा पार पडला. विशेष करुन यावेळी तीव्र उन्हाळा असल्यामुळे जागोजागी पाण्याचे स्टॉल, लंगर हॉलमध्ये कुलर व पंखे, तसेच दशमेश हॉस्पीटलच्या संपूर्ण स्टाफला तत्पर राहण्यास सांगितले होते. हा विवाह म होत्सव यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा घेण्यात याव्यात अशा सुचना देखील केल्या.

यावेळी शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रात प्राविण्य प्राप्त विद्यार्थी आणि प्रतिष्ठित नागरिकांचा विशेष सत्कार करण्यात आला. हा सत्कार कार्यक्रम पंजप्यारे साहिबान यांच्या हस्ते करण्यात आला. ७१ व्या सामुहिक विवाह मेळाव्यात संत बाबा बलविंदरसिंघ कारसेवा वाले (गुरुद्वारा लंगर साहिब), संत बाबा तेजासिंघ (मुखी गुरुद्वारा माता साहिब), आजी-माजी सदस्य, नांदेड दक्षिणचे आमदार आनंद पाटील बोंढारकर यांच्या सुविद्य पत्नी यांच्यातर्फे नवदाम्पत्यास शुभेच्छा भेट देण्यात आली. नांदेड जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक तसेच हैद्राबाद, करीमनगर, बीदर, औरंगाबाद, जालना, परभणी, खामगांव, मुर्तिजापूर, धानोरा (शीख) अशा अनेक



ठिकाणची वऱ्हाड मंडळी विवाह मेळाव्याला उपस्थित होती.

यावेळी गुरुद्वारा बोर्डाचे अधीक्षक रविन्दरसिंघ कपूर यांच्या मार्गदर्शनाखाली व जैमल सिंघ ढिल्लो सहा. अधीक्षक व बलविन्दरसिंघ फौजी सहा. अधीक्षक तसेच विक्रमजीतसिंघ कलमवाले मेळावा विभाग, जसबीरसिंघ शाहू लंगर इंचार्ज, हरपालसिंघ शिलेदार सी.एस.ओ., कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुरबचनसिंघ शिलेदार - प्रिन्सीपल हजूर साहिब आय.टी.आय., खालसा हायस्कूलचे मुख्याध्याक चांद सिंघ, सचखंड पब्लीक स्कूलचे प्रिन्सीपल अनिलकौर खालसा, श्रीम ती बबीताकौर चाहेल - पी.ए., लेखापाल - सतविंदरसिंघ रामगडीया, रोखपाल स. परविन्दरसिंघ वासरीकर, सतनामसिंघ रागी इंचार्ज खेती, तसेच गुरुद्वारा बोर्डाचे सर्व विभाग प्रमुख व संपूर्ण स्टाफने आपली सेवा दिली व गुरुद्वारा लंगर साहिबचे १०० सेवादारांनी विशेष परिश्रम घेतले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com